# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

मा. विशेष महासभा दि. ३०/०३/२०२२

बुधवार दि. ३०/०३/२०२२ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा सकाळी ११.३० वाजता सभा सुचना क्र. ०८ दि. २२/०३/२०२२ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता Video Conferencing द्वारे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | महापौर |
| २) | गेहलोत हसमुख मोहनलाल | उपमहापौर |
| ३) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सभागृह नेता |
| ४) | शाह राकेश रतिशचंद्र | सभापती, स्थायी समिती |
| ५) | पाटील धनेश परशुराम | विरोधी पक्षनेता |
| ६) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ७) | शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ८) | तिवारी अशोक सूर्यदेव | सदस्य |
| ९) | पांडेय पंकज सूर्यमणि | सदस्य |
| १०) | गोहिल शानू जोरावर सिंह | सदस्या |
| ११) | कांगणे मीना यशवंत | सदस्या |
| १२) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १३) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १४) | कदम अर्चना अरुण | सदस्या |
| १५) | नलावडे दिनेश दगडु | सदस्य |
| १६) | भोईर गणेश गजानन | सदस्य |
| १७) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १८) | गुप्ता कुसुम संतोष | सदस्या |
| १९) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| २०) | रावल मेघना दिपक | सदस्या |
| २१) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| २२) | जैन गीता भरत | सदस्या. |
| २३) | जैन सुनिता रमेश | सदस्या |
| २४) | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | सदस्या |
| २५) | मोकाशी दिपाली आनंदराव | सदस्या |
| २६) | व्यास रवि वासुदेव | सदस्य |
| २७) | परेरा कॅटलीन एन्थोनी | सदस्या |
| २८) | रकवी वैशाली गजेंद्र | सदस्य |
| २९) | अग्रवाल सुशील गोपीकिशन | सदस्य |
| ३०) | खंडेलवाल सुरेश जगदीश | सदस्य |
| ३१) | परदेशी गिता हरीश | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ३२) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ३३) | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | सदस्या |
| ३४) | शेख अमजद गफार | सदस्य |
| ३५) | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | सदस्य |
| ३६) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ३७) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ३८) | शिर्के अनंत गेणू | सदस्य |
| ३९) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ४०) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ४१) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| ४२) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| ४३) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ४४) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ४५) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ४६) | चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ४७) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| ४८) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ४९) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ५०) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ५१) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ५२) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ५३) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ५४) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ५५) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ५६) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ५७) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ५८) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ५९) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ६०) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ६१) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| ६२) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ६३) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ६४) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६५) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६६) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ६७) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |
| ६८) | भट दीप्ती शेखर | सदस्या |
| ६९) | कासोदारिया अश्विन शामजीभाई | सदस्य |
| ७०) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ७१) | भावसार वंदना संजय | सदस्या |
| ७२) | शाह सीमाबेन कमलेश | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ७३) | दुबे मनोज रामनारायण | सदस्य |
| ७४) | विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ७५) | अहमद साराह अकरम | सदस्या |
| ७६) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ७७) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| ७८) | भोईर जयेश भानुदास | सदस्य |
| ७९) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| ८०) | भानुशाली वर्षा गिरधर | सदस्या |
| ८१) | म्हात्रे विनोद काशिनाथ | सदस्य |
| ८२) | बगाजी शर्मिला विन्सन्ट | सदस्या |
| ८३) | शर्मा भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ८४) | ॲड शफीक अहमद सादत खान | नामनिर्देशित सदस्य |
| ८५) | भोसले अनिल बाबुराव | नामनिर्देशित सदस्य |
| ८६) | अजित भगवान पाटील | नामनिर्देशित सदस्य |
| ८७) | सिंह विक्रमप्रताप रमाप्रती | नामनिर्देशित सदस्य |

<u>गैरहजर सदस्य -</u>

| | | |
|---|---|---|
| १) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| २) | ढवण निलम हरीश्चंद्र | सदस्या |
| ३) | धृवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ४) | जैन राजेंद्र भवरलाल | सदस्य |
| ५) | रॉड्रीकस मोरस जोसेफ | सदस्य |
| ६) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| ७) | मेहता डिम्पल विनोद | सदस्या |
| ८) | भोईर कमलेश यशवंत | सदस्य |
| ९) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| १०) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ११) | बांड्या एलायस दुमिंग | सदस्य |

रजेचा अर्ज - निरंक

मा. महापौर :-

सर्व सन्मा. सभागृहात हार्दिक स्वागत. सचिवांनी सभेला सुरुवात करा.

नगरसचिव :-

पिठासीन अधिकाऱ्यांच्या परवानगीने बोलतो, सर्व सन्मा. सदस्यांच कोविड कालावधी नंतर होणाऱ्या प्रदिर्घ कालावधीनंतर मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा आज प्रत्यक्ष सभागृहात होत आहे. सर्व सदस्याचं हार्दिक स्वागत आणि अभिनंदन. सर्व सदस्यांनी वंदे मातरम् साठी जागेवर उभे राहायचे आहे. (सभासुचना टाईप करणे)

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो अतिशय आनंद होत आहे की, आज गेल्या कोविडच्या कालावधीपासून 26/2/2020 रोजी शेवटची महासभा ह्या सभागृहात पार पडली. त्यानंतर

कोणाचा प्रार्दुभाव आला आणि आज दि. 25 महिने म्हणजे 2 वर्षे 1 महिना 3 दिवसानंतर आजची महासभा होत आहे. खरोखरंच ह्या सभागृहाच्या वतीने मी सगळ्यांचे अभिनंदन करतो त्यांचे स्वागतही करतो आणि महापौर मॅडम आपणही ह्या शहराच्या प्रथम नागरिक आहेत गेली दोन वर्षे पाहत होते सगळ मिरा भाईंदर हे कोविडच्या काळामध्ये जनमाणूस कोणी रस्त्यावरती उतरत नव्हतं परंतु आपण ही आपल्या महपौर पदाच्या कार्यकालामध्ये आपली फॅमीली देखील ह्या कोरोनामध्ये हॉस्पीटलाईज होती आणि असे असतानाही मग कोविड सेंटर असो किंवा कोविड सेंटरमध्ये जाऊन तेथील ऑक्सीजनची पाहणी करणे, तेथील बेडची पाहणी करणे त्याचबरोबर कुठे औषणांची कमतरता तर नाही ना ह्याची पूर्ण ह्या शहरामध्ये आपण होते आणि आपल्यासोबत आमचे नगरसेवक, आपले सगळे लोकप्रतिनिधी ह्या शहरामध्ये ज्यांना ज्यांना कोरोनाचा प्रादुर्भाव झाले आहे तो कसा कमी करता येईल, त्यांना कसं वाचवता येईल या दृष्टीने आपण सगळे जण प्रयत्न करत होतो. सगळेच त्या कामामध्ये झटत होतो आणि हे सुरु असताना देखील आपण ह्या शहराच्या निगडीत प्रश्न असो आपण त्या व्ही.सी च्या माध्यमातून गेले दोन वर्षे सातत्याने सोडवत होतो. पोटतिडकीने कोणाला बोलायचं म्हटलं की कोणाला त्याचे मत मांडता येत नव्हतं आपले प्रश्न तर कधी कधी ह्या ठिकाणी व्ही.सी. वरती मिटींग असल्यामुळे त्याठिकाणी प्रत्यक्ष कोणाचा आवाज पोहच नव्हता. कधी कधी रेंजमध्ये प्रॉब्लेम येत होते आणि अशा परिस्थितीमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधीने आपल्या सर्व की आपल्या भावना त्या त्यांना व्यक्त करायच्या असतात किंवा मग शहरातील नागरिकांचे प्रश्न असतील मग ते प्रश्न कसे सुटले जातील ह्या करिता तातडीने ते आयुक्त महोदयांची भेट घेत असत किंवा मग महापौर मॅडमची भेट घेत असत आणि हे सगळं होतं एक आपण शहरामध्ये बघितलं आपले रस्ते बंद होते, गाड्या बंद होत्या परंतु महापौर मॅडम त्याठिकाणी आपण फिरुन ह्या कोरोना काळात कर्तव्य बजावत होत्या आणि म्हणून आज मी महापौर मॅडम मी असेल, विरोधी पक्षनेते असतील किंवा स्थायी समितीचे सभापती असतील आम्ही असे केले आहे की आज मा. महापौर मॅडमचा सत्कार करावा. ह्याठिकाणी सभागृहाच्या वतीने तसेच ह्याठिकाणी हे कर्तव्य बजावत असताना कोरोनाचा प्रार्दुभाव वाढत असताना देखील ह्या शहराला लाभलेले आपले कार्यसम्राट आयुक्त आदरणीय दिलीप ढोले साहेब यांचा ही मी आवर्जुन उल्लेख करेल की ज्या वेळेला त्यांनी ह्या महापालिकेमध्ये जेव्हा रुजू झाले त्यावेळेला त्यांनी अति. आयुक्त म्हणून आपला पदभार स्विकारला परंतु अति. आयुक्तांचा पदभार स्वीकारत असताना देखील त्यांनी ह्या मिरा भाईंदर शहराची जाण करुन घेतली अभ्यास करुन घेतला आपण ऐकले असेल बरेच वर्तमान पत्रातून, मिडियातून त्यांचा त्याठिकाणी उल्लेखनीय कामाबद्दल त्यांचा उल्लेख झाला की त्यांनी ऑक्सीजन प्लान्ट आपण ऑक्सीजन निर्मिती पण ह्या ठिकाणी करायला लागलेलो आहेत. ह्याठिकाणी हे सगळे करत असताना जे कोरोना प्रार्दुभावाने वाढलेले ग्रस्त होते त्यांचा कसा जीव वाचवला जाईल हे त्याठिकाणी ते पाहत होते आणि हे असं सगळं करत असताना त्यांना आता नुकतचं ह्या कोरोना काळात कर्तव्य दक्ष राहून उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सकाळ सन्मान पुरस्काराने गौरवण्यांत आलं आणि त्याबद्दल मी सभागृहाच्या वतीने आदरणीय दिलीप ढोले साहेबांचे ह्या ठिकाणी अभिनंदन करु इच्छितो. एवढेच नव्हे तर महापालिकेचे सर्वच आमचे पदाधिकारी सन्मा. लोकप्रतिनिधी ह्याठिकाणी कोरोना काळात झटत होते मग आमचे उपमहापौर पण त्याठिकाणी हसमुख गेहलोतजी पण कुठे कमी पडले नाहीत. तेही कोणाला ऑक्सीजन, कोणाची बेडची व्यवस्था, रमडीसीवरची इंजेक्शन देण्याकरिता धावपळ करायचे मी सातत्याने त्यांना ही बघत होतो उद्घाटन राहिली बाजूला परंतु उद्घाटन न करिता कोण पेशंट, कोणाला बेड मिळत नाही यांची ते प्रामुख्याने लक्ष देत होते त्याठिकाणी आणि म्हणून मी ह्याठिकाणी त्यांचाही गौरव करेल आणि हे सगळं करत असताना ह्या सभागृहाच्या वतीने मी विरोधी पक्षांना पण विनंती करतो आणि स्थायी समिती सभापतींना विनंती करतो आपण तिन्ही जण जाऊन मा. महोदयांचा सत्कार करायचा आहे.

धनेश पाटील :-

मिरा भाईंदर शहरामध्ये विकास कामाचा महाविकास आघाडी शासनाकडून विविध विकास कामे व निधी मंजूर केल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव. मिरा भाईंदर शहरात विकास कामाच्या मार्गावर घेऊन जाण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे महाविकास आघाडीचे मुख्यमंत्री मा.श्री. उद्धवजी ठाकरे साहेब, उपमुख्यमंत्री अजीत दादा पवार साहेब नगरविकास मंत्री तथा ठाणे जिल्हा पालक मंत्री एकनाथ शिंदे साहेब, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे साहेब, खासदार राजेंद्र विचारे साहेब, विधानसभा परिषद सदस्य रविंद्र पाठक साहेब यांच्याकडे सतत पाठपुरावा करुन मा. आमदार प्रताप सरनाईक मिरा भाईंदर प्रताप सरनाईक साहेब, मा. आमदार गिता जैन मॅडम, माजी आमदार मुझफ्फर हुसेन साहेब यांनी मिरा भाईंदर शहरासाठी विकास कामासाठी महाविकास आघाडी शासनाकडून विविध विकास कामे व निधी मंजूर करुन घेतल्याबद्दल सर्व मान्यवरांचे नगरसेवक नगरसेविकांकडून मनपूर्व अभिनंदन असा ठराव मांडत आहे.

जुबेर इनामदार :-

माझे अनुमोदन आहे.

अश्विन कासोदरिया :-

महापौर मॅडम, यह जो ठराव है उसमें मेरे को भी अभिनंदन देना है धन्यवाद महापौर मॅडम मिरा भाईंदर सभागृह के सदस्या माजी महापौर, वर्तमान आमदार गिता जैन द्वारा प्रशासन कह रहे है 2022-23 अर्थसंकल्प में विहित काम के लिए चाहे सुर्या डॅम का पानी का लाईन डाल के उसका नियोजन करना, ठाणा, मुंबई, विरार सभी जगह पे जेटी प्लान करने के लिए 223 कोटी लेके आए 943 कोटी रुपये वर्तमान आमदार गिता जैन मिरा भाईंदर शहर के लिए लेके आए यह इतिहास में पहली बार 943 कोटी मंजूर करवाया उसके लिए में आमदार गिता जैन का मिरा भाईंदर वासियो के और से धन्यवाद करता हूँ और जो यह ठराव किया है उसके अंदर यह समाविष्ठ किया जाए|

दिनेश जैन :-

अभी जो विरोधी पक्षनेताने जो ठराव मांडा है उसके अंदर तीन नेताओ का उल्लेख किया है और से एक नेता का सिर्फ हो रहा है तो ठराव बरोबर है की नही चेक करने को बोल दिजीए जरा|

अश्विन कासोदरिया :-

मैंने सुचना डालने के लिए बोला है, मैंने सुचना रखी है ठराव किया उसमें सभी आमदार, खासदार, मंत्रियो का नाम लिया गया है| मुख्यमंत्री सभी का नाम लिया गया है, दिनेशजी में सदस्य हूँ, मेरा अधिकार है यहाँ के स्थानिक आमदार का सन्मान करना में सभी का सन्मान किया है|

गिता जैन :-

महापौर मॅडम, आज दोन वर्षानंतर जवळ जवळ आपण ऑफलाईन सभा घेतली त्याबद्दल मी आपले ही अभिनंदन करते. आणि दळवी साहेब वाचताना विसरले आपल्या आयुक्त साहेबांना दोन अवॉर्डस मिळालेले आहेत. एक गव्हर्नर साहेबांनी ही त्यांना अवॉर्ड दिला आहे म्हणून त्यांचे अभिनंदन करायला उभी राहिली कारण ते पॉईंट कदाचित खूप जून म्ळणून विसरले असेल म्हणून ते पॉईंट ॲड करावा लागेल की त्या अभिनंदनाच्या ठरावात ते ही ॲड करा की त्यांना गर्व्हनरकडूनही पुरस्कार मिळाला आहे आणि हे आपल्यासाठी म्हणजे एखादा कमिशनर कसा काम करु शकतो आणि मिरा भाईंदर शहरासाठी ही गर्वाची बाब आहे मला वाटते त्यांचे जे सहयोगी आहेत त्यांना ही त्याबद्दल गर्व वाटत असेल की आमचे हेड आयुक्त त्यांना दोन दोन प्रतिष्ठित अवॉर्डस मिळाले म्हणून आमच्या पक्षातर्फे आता आमचा पक्ष कुठला ते तुम्ही समजून घ्या पण पूर्ण सभागृहातर्फे मी त्यांचे अभिनंदन करते.

नगरसचिव :-

स्थायी समिती सभापती, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन 2021-22 चे सुधारीत व सन 2022-23 चे मूळ अंदाजपत्रक मा. महासभेसमोर मान्यतेसाठी सादर करण्यासाठी येत आहेत त्यांनी कृपया डायसवरती यायचे आहे.

दिपाली मोकाशी :-

नमस्कार. मला गेल्या अडीच वर्षामध्ये फंडामीकमध्ये सर्वांनी काम केलं त्याबद्दल महापौर मॅडम, आयुक्त साहेब आणि उपमहापौर यांचा आणि स्थानिक आमदार यांचे स्वागत आणि त्यांचे अभिनंदन आहे पण मला असे वाटते इथे बसलेले प्रत्येक नगरसेवक, नगरसेविका यांनी पण जमिनीवर उतरुन सर्व काम केलेले आहे त्यामुळे त्यांचे पण अभिनंदन करणे गरजेचे आहे. तसेच कोविडच्या काळामध्ये सर्वात जास्त जर का कोणी मेहनत केली असेल तर आपल्या महानगरपालिकेच्या सर्व सफाई कर्मचारी, आरोग्य कर्मचारी, डॉक्टर्स आणि सर्व स्टाफनी इथे हजर राहून सर्वांनी सेवा केली त्याबद्दल त्यांचे ही अभिनंदन करते.

रिटा शाह :-

महापौर मॅडम, स्टॅन्डिंग कमिटीचे सभापतींचे स्वागत आहे. परंतु आज महापौर मॅडम, मी तुमचा आणि आयुक्त साहेबांचे मनापासून अभिनंदन व्यक्त करते. कारण आज आपण पहिल्यांदा अडीच वर्षानंतर पहिल्यांदा आपण सभागृहात आलो आहोत. परंतु आयुक्त साहेब तुमचे मनापासून सर्व महिला नगरसेविकांतर्फे, सर्व नगरसेवकांतर्फे तुमचे अभिनंदन आहे. कारण आज तुम्ही आमचे रांगोळी काढून आणि ग्रँड वेलकम केलं त्याबद्दल खूप खूप धन्यवाद.

नगरसचिव :-

मा. सभापती श्री. राकेश शाह हे महासभेपुढे बजेट सादर करत आहेत. मान्यतेसाठी. सन 2021-22 सुधारीत व सन 2022-23 मूळ अदांजपत्रकासंबंधी सन्मा. सभापती श्री. राकेश शाहजी हे आपले निवेदन सादर करत आहेत.

राकेश शाह :-

सन्मा. महापौर, श्रीम. हसनाळे मॅडम सन्मा. उपमहापौर, श्री. गहलोतजी, मा. आयुक्त श्री. ढोले साहेब, सभागृह नेते श्री दळवीजी, विरोधीपक्ष नेता श्री.धनेश पाटीलजी, अति. आयुक्त, सर्व उप-आयुक्त तसेच सर्व सन्मा. नगरसेवक/नगरसेविका, तसेच सर्व अधिकारी/कर्मचारी वर्ग, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरीक बंधु-भगीनी तसेच आमचे सन्मा. पत्रकार बंधु भगीनींनो...

मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे सन 2021-22 चे सुधारित व सन 2022-23 चे मुळ अंदाजपत्रक आपणासमोर सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. दि. 25 फेब्रुवारी 2022 रोजी मा. आयुक्त महोदयांनी मा. स्थायी समितीच्या सभेत सदर अंदाजपत्रकावर सादर केले होते.

मालमत्ता करांत सुट :-

मा.आयुक्तांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकावर आम्ही स्थायी समितीच्या सदस्यांनी तसेच आमच्या सहकारी नगरसेवक मित्रंची चर्चा/ विचार विनिमय करुन आम्ही अंदाजपत्रकात काही महत्वाचे विकासभिमुख बदल केलेले आहेत सदर बदल मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना डोळयासमोर ठेवुन त्यांच्या समस्यांचे निराकरण होणेचे दृष्टीने केलेले आहेत. सन्मा. पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी, महाराष्ट्रातील आमचे नेते सन्मा. श्री. देवेंद्रजी फडणवीसजी, मा. चंद्रकांतदादा पाटील, आमचे नेते मा. आमदार श्री. रविंद्र चव्हाण, मा. श्री नरेंद्र मेहता, सन्मा. महापौर श्रीम. हसनाळे मॅडम, उपमहापौर, श्री. गहलोतजी यांच्या मार्गदर्शनाखाली व मार्गदर्शक तत्वानुसार केलेले आहेत.

मा. महासभेने शहरवासीयांसाठी 500 फुटांखालील नागरीकांना मालमत्ता करात माफी देण्याचा ठराव बहुमताने पारीत केला होता. या ठरावाचे प्रतिबिंब सदर सन 2022-23 च्या अंदाजपत्रकात

दिसेल. या व अशा प्रमुख लेखाशिर्षाखाली भरघोस तरतुद करण्यात आली आहे जेणेकरुन मिरा भाईदर शहराच्या समस्यांचे निवारण करतांना प्रशासनाला निधी कमी पडू नये याची दक्षता घेण्यात आली आहे.

मा. स्थायी समितीने खालीलप्रमाणे नविन उपक्रम सुचविले आहेत.

1) शहरातील वस्त्यांमध्ये विविधपयोगी योजना राबविणे. (उदा. आरोग्य केंद्र, शाळा, गार्डन, गल्लीबोळांत रस्ते/गटारे बांधणे इ.)

2) शहरातील विविध आरक्षणे विकसीत करणे.

3) नविन योग/ध्यानधारणा सेंटर उभारणे.

4) शहरातील झोपडपट्टी वस्तीत आरोग्य केंद्र सुरु करणे.

5) महानगरपालिकेची स्वतंत्र डायलेसीस सेंटर व रक्त चाचणी, पॅथोलॉजी लॅब उभारणे.

6) क्ष्.क्.छ. च्या सुविधेसह डॉक्टर उपलब्ध असलेली ॲम्बुलन्स सेवा सुरु करणे.

7) मनपा शाळेतील विद्यांर्थ्यांना गुणवत्ता वाढीसाठी विशेष तरतुद. विद्याथ्र्यांसाठी डिजीटल क्लासरुम सुरु करणे.

8) महानगरातील 500 स्के.फुट सदनिका धारकांना मालमत्ता करात थेट सुट देण्यास तरतूद केलेली आहे.

"सबका साथ सबका विकास" या सन्मा. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदीजींच्या "मंत्राला" प्रत्यक्षात उतरविण्यासाठी आम्ही सर्व कटीबध्द आहोत. त्याचेच प्रारुप म्हणजे सन 2022-23 चे अंदाजपत्रक होय. सदर अंदाजपत्रक अमलात आणण्यासाठी आपली साथ मिळेल अशी अपेक्षा करतो.

तरी या व्दारे मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन 2021-22 चे सुधारीत व सन 2022-23 चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीच्या मंजुरीने सन्मा. महापौर महोदयांकडे अंतिम मंजुरीसाठी सादर करीत आहे. यांस मा. महासभेची मंजुरी मिळावी ही विनंती.

सहकार्याबद्दल आभारी ! धन्यवाद !

दिपिका अरोरा :-

महापौर मॅडम, तुमच्या परमिशनने काही मला एक सुचना मांडायची आहे. यह बजेट आज पास हुआ ढाई साल के बाद महासभा स्टार्ट हुई, अभिनंदन हुए सबके, यह जो बजेट है इसमें से बहुत सारे काम होगे शहर के डेव्हलपमेंट के और हर जगह पे उद्घाटन अपने अपने स्वरुप में किया जाएगा|

मा. महापौर :-

सन्मा. सदस्या विषयाला सुरुवात केलेली आहे. आपल्याला नंतर वेळ दिला जाईल.

दिपिका अरोरा :-

मॅडम हे इम्पॉर्टंट आहे. सर्व पक्षीय प्रॉब्लेम होणार आहे.

मा. महापौर :-

आज बजेटची मिटींग आहे त्यामुळे विषयाला धरुन बोला. ह्या विषयावरती सन्मा. पदाधिकारी, गटनेते यांची सर्व पक्षीय बैठक होणार आहे आणि त्यावर निर्णय घेतला जाईल. आजच्या बैठकीमध्ये आपण ह्याविषयावरती चर्चा न करता बजेटच्या संदर्भामध्ये काही असे तर चर्चा करा.

दिपिका अरोरा :-

ठीक आहे मॅडम हेच ऐकायचे होते. ह्याविषयी मिटींग होणार आहे की जे ते रुल पास होणार साहेब तुम्हाला पण विनंती आहे की प्रत्येक नगरसेवकांना तुम्ही एक लेटर पाठवावं काय नोंद झालेले आहे काय रुल तुम्ही पास केलेले आहेत.

जुबेर इनामदार :-

सन्मा. महापौर मॅडम तुम्ही घोषणा केली गटनेत्यांची समिती स्थापन करुन मी गटनेता आहे मलाच माहिती नाही.

मा. महापौर :-

आपण सर्वपक्ष, आपल्या गटनेत्यांची चर्चा, बैठक म्हटलं समिती नाही म्हटले.

जुबेर इनामदार :-

कसली बैठक आहे त्याची आगाऊ सुचना करा. म्हणजे आमची मानसिक तयारी असेल.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्या दिपिका अरोरा मॅडमने जो प्रश्न उपस्थित केला त्याविषयावरती बैठक लावू.

जुबेर इनामदार :-

उपस्थित कुठे केला.

मा. महापौर :-

आता केला तुम्ही नाही ऐकला.

जुबेर इनामदार :-

त्यांनी अर्धवट प्रश्न केला.

मा. महापौर :-

त्या बोलल्या म्हणूनच मी बोलली की आपण सर्व पक्षीय गटनेते बसून त्याच्यावरती निर्णय होणार.

जुबेर इनामदार :-

त्या विषयामध्ये तुमची प्रमुख भुमिका होती त्यासाठी तुमचे अभिनंदन करु इच्छितो.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 107, परिवहन सेवेचे सन २०२१-२२ चे सुधारित व सन २०२२-२३ चे मूळ अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १४/०३/२०२२ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. १८६, ठराव क्र. १५६)

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, ह्या ठिकाणी “ज” चे प्रस्ताव आलेले आहेत मी सन्मा. सदस्य जुबेरजी इनामदार यांचाही ज चा प्रस्ताव आहेत तर ते क्लब करुन घेऊया.

जुबेर इनामदार :-

मला क्लब करायला काही हरकत नाही. ज चा प्रस्ताव धृवकिशोर पाटील यांचा होता आणि ते आज सभागृहात नाहीत.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, धृवकिशोर पाटील यांच्या आईची तब्येत सिरियस असल्यामुळे ते आले नाहीत.

जुबेर इनामदार :-

आम्हाला संधी परिपूर्ण देण्यात यावी कारण ज चा प्रस्ताव आमचा आहे. नंतर असं व्हायला नको आम्ही ठराव केला नाही.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, आपणाला विनंती आहे की ज चे प्रस्ताव क्लब करुन घ्यावे.

जुबेर इनामदार :-

तुमच्या विनंतीचा आम्ही मान ठेवला.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य ज चे प्रस्ताव दोन्ही एकत्रित करुन आपण चर्चा करा.

जुबेर इनामदार :-

जर तुम्ही विषय एकत्र करत असाल तर मला परिपूर्ण चर्चा करण्याची संधी देण्यात यावी. तुमचा शब्द आम्हाला तसा पाहिजे.

मा. महापौर :-

मी तुम्हाला आधीच म्हटलेल आहे की तुम्हाला परिपूर्ण संधी देणार आहे.

जुबेर इनामदार :-

धन्यवाद महापौर मॅडम.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम आपण विशेष महासभा ह्या बजेटसाठी लावलेली आहे आणि त्यामुळे ज चे प्रस्ताव ज्यांचे ते मांडतीलच त्यावर चर्चा करतीलच त्याही व्यतिरिक्त ज्यांना बजेटवरती बोलायचं आहे ज्यांना बजेट समजतं ज्यांना बजेटवरती बोलायचे आहे त्यांनीच फक्त ह्या सभागृहामध्ये आजच्या बैठकीला बोलायचं अशी माझी आपणांस विनंती राहील.

जयंतीलाल पाटील :-

महापौर मॅडम बजेटची मिटींग चालू आहे हे काय विषय घेत बसले एकदा झाला ना सत्कार इथे दहा वेळा कुठेही खोड्या करायच्या आणि काहीतरी बोलायचं हे योग्य आहे का? आता ज्या गिता जैन मॅडमने बोललं त्याच्या कुठेतरी काही तरी बोलायचं, प्रशांत दळवीला समजत नाही का? लोकांना सांगतात बजेट मिटींग चालू आहे आणि कुठे ही खोड्या काढायच्या.

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

सर्व सन्मा. सदस्यांना विनंती आहे की कृपया आपण परवानगी घेऊन बोलावं आणि उभं राहून बोलावं. कारण आज प्रथमच आपण ह्या सभागृहामध्ये आलेलो आहोत आणि विषय सोडून कृपया बोलू नका. विषयपत्रिकेवरती जे विषय आहेत त्या विषयावरती चर्चा केली तर ही सभा अतिशय चांगल्या पध्दतीने आपल्याला करता येईल. शहराच्या हिताच्या दृष्टीकोनातून जे काही विषय ह्या बजेटमध्ये आलेले आहेत त्यावरतीच आपल्याला बोलायचं आहे आणि मला असे वाटते स्थायी समितीमध्ये आपले पण सदस्य होते सत्ताधारी पक्षाचे पण सदस्य होते ते सगळ्यांनी चांगल्या पध्दतीने चर्चा करुन एक सुंदर असा बजेट आपल्याला महासभेमध्ये दिलेला आहे तर आपण बजेटवरती बोलावं गटनेते जे आहेत त्यांना मी संधी देईल की त्यांनी आपले वक्तव्य बजेटच्या संदर्भामध्ये ह्याठिकाणी करु शकता सर्व पक्षीय गटनेते.

गिता जैन :-

मॅडम फक्त एक हरकत आहे आता त्यांनी सांगितलं की ज्यांना कळत असेल त्यांनीच बोलावं मॅडम. बरेच नगरसेवक कदाचित पहिल्यांदाच आले परत आपल्याकडे पहिल्यांदा आले. बोलणार तेव्हाच ते शिकणार तर त्यांना शिकण्याची संधी देण्यात यावी.

मा. महापौर :-

आता ही शिकायची वेळ इथे नाही. आपल्याकडे आता बजेट आलेला आहे ह्या बजेटच्या संदर्भामध्ये आपल्याला कोणाला काही बोलायचं असेल तर मी नक्कीच संधी देईल.

गिता जैन :-

आणि दुसरं मॅडम घोडा घालायचा हा शब्द नाही वापरायला पाहिजे एखादी वस्तु आठवल्यानंतर बोलणार.

मा. महापौर :-

मॅडम आपण बसा ठीक आहे ते बोलले ठीक आहे. आता झाले बोलून आता मला वाटते आपण विषयाला सुरुवात केले तर बरं होईल. बजेटवरती मिटींग नाही करायची का? सचिव साहेब आपण विषयाला सुरुवात करा.

नगरसचिव :-

महापौरांच्या परवानगीने, प्रकरण क्र. 107 मध्ये सहपुरक घोषणावरतील प्रकरण क्र. 110 सन्मा. सदस्य श्री. धृवकिशोर पाटील यांचा दि. 24/3/2022 रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव प्रकरण क्र. 107 परिवहन सेवेचे सन 2020-21 चे सुधारित व सन 2022-23 चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत व प्रकरण क्र. 113 सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार यांचा दि. 24/3/22 रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सेवेचे सन 2021-22 सुधारित व 2022-23 चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत हे एकत्र प्रकरणावर चर्चा करण्यांत येत आहे.

प्रविण पाटील :-

महापौर मॅडम, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या दृष्टीकोनातून बजेटची सभा ही फार महत्वाची असते ती आज आपण ऑफलाईन घेत आहोत त्याच्याबद्दल अजूनही सगळ्यांच्या मनामध्ये उत्साह आहे की ह्या शहराला एक वेगळा अपेक्षा ह्या मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून आहेत. ह्यापूर्वी बजेटच्या आयुक्त साहेब महापौर मॅडम तुम्हाला विनंती आहे ह्यापूर्वीच्या बजेटच्या वेळीचे बरेच सदस्य आहेत. आमच्या बजेटच्या मिटींग होत्या महापौर मॅडम, आयुक्त साहेब त्या तीन तीन दिवस चालायच्या एक मॅरेथॉन असायची जशी स्थायी समितीची मॅरेथॉन होते त्याप्रमाणे मॅरेथॉन असायची हेड टू हेड चर्चा व्हायची. जेणेकरुन ह्यावेळेस शहरातील प्रत्येक वर्गाला न्याय मिळेल अशी अपेक्षा ह्या सभागृहाच्या माध्यमातून ह्या मिटींगच्या माध्यमातून अपेक्षा ह्या शहराला आहेत. तसेच लोकप्रतिनिधीला आहेत. कारण गेल्या 4-5 वर्षापासून किंवा गेल्या 5-7 वर्षापासून आम्ही बघतो बजेटची सभा ही पटकन गुंडाळली जाते. मॅडम तुमच्याकडे बहुमत आहे तुमचा अधिकार आहे तुम्ही अर्धा तासात ही सभा आटपू शकता पण आपल्याला विनंती मॅडम बरेच सदस्य जुने आहेत हेड टू हेड चर्चा व्हावी जेणेकरुन ह्या सभेचा फायदा जो काही तोटा किंवा नुकसान किंवा असलेले सगळे मुद्दे ह्या बजेटच्या पुस्तकामध्ये असलेले सगळे मुद्दे ह्या सगळ्या नगरसेवकांना ह्या शहरातील पुढच्या प्रत्येक वर्गाला समजेल अशी अपेक्षा आहे की जेणेकरुन हाच विषय ही बजेटची सभा हेड टू हेड चर्चा व्हावी अशी आपणांस विनंती आहे. धन्यवाद.

जुबेर इनामदार :-

सन्मा. महापौर, सन्मा. आयुक्त, सन्मा. उपमहापौर, सन्मा. सभागृह आज दोन वर्षानंतर आम्ही एकदुसऱ्याला परत ह्या सभागृहामधली सभेची उपस्थिती मी सर्वांचे अभिनंदन करु इच्छितो. एक सदस्य आपल्यामध्ये नाही. कोरोनामध्ये ते गमावले गेले त्यांची कुटुंबातील काही लोक गेली. कदाचित ह्या सभागृहामध्ये बरेच काही सदस्य असतील त्यांच्या कुटुंबामधली बरेच काही लोक आता नाहीत. त्या सर्वांना खरतर ह्या सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली देतोच आणि वारंवार परत देऊ देत राहू त्याचसोबत ह्या सभागृहाची जी गरीमा दोन वर्षाआधी ह्या सभागृहासोबत चालायचं किंवा इतक्या वर्षामध्ये चालत आलेले ही गरीमा टिकावी आणि ती आपण टिकवून ठेवली पाहिजे. सत्ताधाऱ्यांनी आपली बाजू मांडणे सत्ताधाऱ्यांचे कर्तव्य आहे. योजना, निर्णय, ठराव बहुमताच्या जोरावर होत असतात. विरोधीपक्ष जो असतो तो त्या तुमच्या केलेल्या निर्णयाचा विश्लेषण करतो. इच्छोदान करण्याचा अधिकार स्वत:ला हिसकावून घेऊ नका महापौर मॅडम, माझी तुम्हाला विनंती आहे चर्चा होऊ द्या माझे मित्र प्रविण पाटील चांगले बोलले ह्या सभागृहामध्ये इतिहास राहिलेला आहे प्रत्येक हेडवर चर्चा झाली पाहिजे आणि त्यांचा फायदाच होणार आहे. नुकसान काही होणार नाही चांगली भुमिका तुम्ही मांडू शकाल चांगले विचार आम्ही मांडू शकू. त्याच्यातून ह्या शहराचे भलं करायच आहे

आपल्याला कुठे तुम्ही किंवा आम्ही कुठे काही ह्या शहराचे नुकसान करायला इथे बसे बसलेलो नाहीत. प्रत्येक लोकप्रतिनिधींची इच्छा आहे की माझ्या प्रभागामध्ये, माझ्या शहरामध्ये चांगलं काम झालं पाहिजे. प्रशासनाबरोबर हा संवादाचा एक मोका असतो. प्रत्येक सदस्य माझा चांगले मित्र आहे प्रशांत दळवी सभागृह नेते आहेत ते बोलताना थोडेसे चुकले ठीक आहे, सर्वांना त्याची समज आहे चर्चा झाली तर समज वाढेल त्यांना ही समजेल की आपण कुठे कमी पडतो. आर्थिक बाबी आपल्या शहराच्या काय आहेत, आपला अर्थसंकल्प कसा तयार केला गेला त्याच्यामध्ये येणाऱ्या अडीअडचणी उत्पन्न, महसूल, खर्च, भांडवली, अनुदान हा जो प्रकार आहे तो सर्व चर्चेमधून समजून येणार आहे. सर्व इथे उपस्थित असलेले नगरसेवक सन्मा. सदस्य सुशिक्षित आहेत, लोकांनी त्यांना निवडून दिले आहे, त्यांना जबाबदारी दिलेली आहे त्यांची जबाबदारी त्यांनी इथे सभागृहामध्ये पार पाडली पाहिजे, त्यांना त्याची संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे. महापौर मॅडम, आपले धन्यवाद आणि आपले अभिनंदन महापौर मॅडम, उपमहापौर साहेब सभागृहामध्ये दोन वर्षानंतर आपली उपस्थिती अर्थसंकल्पाची सुरुवात मी श्री गणेश म्हणून करत आहे. परिवहन उपक्रम हा पहिला विषय आहे. थोडीशी आर्थिक बाब आणि दुसरं महाराष्ट्र महानगरपालिकेचा अधिकार तर त्या दोन बाजू मी एकत्र घेणार आहे. आयुक्त महोदय, महासभा ही आयुक्तांनी दिलेला अर्थसंकल्प तो स्थायीकडे गेला, स्थायी समिती त्याच्यावर चर्चा केल्यानंतर त्यांचा अर्थसंकल्प तो महासभेसमोर सादर करणार पूर्वी महासभेमध्ये कुठल्याही कोन्यामधून सभागृहाच्या सदस्य उठायचे आणि त्यांनी मांडलेला निधीमधला फरक, तरतूद त्याच्यामध्ये अंतर्भुत केला जात होता. काही वर्षा आधी विक्रमकुमार साहेब, तत्कालीन आयुक्त असताना कायद्याची बाजू मांडली ते केंद्राच्या प्रस्तावाशिवाय चर्चा करता येत नाही किंवा तो अधिकार कोणालाही प्राप्त नाही. महासभेलाही प्राप्त नाही जोपर्यंत चर्चेचा विषय "ज" च्या माध्यमातून येत नाही. आता परिवहनमध्ये जे "ज" च्या माध्यमातून येत नाही. आता परिवहनमध्ये जे "ज" चा प्रस्ताव मांडणारे सदस्य धृवकिशोर पाटील उपस्थित नाहीत याचा अर्थ त्यांचा "ज" चा प्रस्ताव त्यांचा अधिकारांचा तो मांडता येतो.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम, अधिकार पत्र देवू शकतात.

जुबेर इनामदार :-

अधिकार पत्र सभागृह सुरु होण्याच्या आधी सचिवांकडे आलेले आहे का?

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, माझी विनंती आहे ह्या ठिकाणी सुचक आणि अनुमोदक दिनेश जैन आहेत.

दिनेश जैन :-

महापौर मॅडम ह्या परिवहनच्या.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, माझी विनंती असेल की आपण ह्याला अनुमोदक ज्यांनी दिलेले आहेत दिनेश जैन सन्मा. सदस्य ते ह्या विषयावर बोलतील प्रथमत: जुबेर इनामदार यांना विनंती करेल की आपण ही "ज" च्या प्रस्तावाला आपले सुरुवात करावी. एकत्रितपणे बोलल्यानंतर महापौर मॅडम आणि पहिले कसे बजेट बनवत होते किंवा पहिल्या कशा महासभा होत होत्या तर महापौर मॅडम हे माजी उपमहापौर माझे मित्र प्रविण पाटील यांना देखील माहिती आहे आणि म्हणून महापौर मॅडम सभागृहाचा वेळ न वाया घालवता ज्या हेडवरती आपल्याला चर्चा करायची आहे मी कुठल्या सन्मा. सदस्यांना कोणालाही कमी केलेले नाही परंतु ज्यांना कोणाला ह्याबद्दल बोलायचं आहे त्यांनी सर्वांनी शांततेने बोलावं. मॅडम काही प्रॉब्लेम नाही काहीतरी मनाला लावून घ्यायचे नाही की आम्हाला बोलता येत नाही, बोलायला देणार नाही किंवा अशातला भाग नाही. ज्यांना कोणाला तर ते जी वस्तुस्थिती

आहे ती तुम्हाला ज्या हेडविषयी ह्या ठिकाणी मांडायचं आहे ह्याठिकाणी शांततेत मांडा. शांततेत आपलं म्हणणे पूर्ण करु द्या महापौर मॅडम आणि नंतर आपण.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य धृवकिशोर पाटील यांच्या वतीने दिनेश जैन बोलतील.

जुबेर इनामदार :-

कायद्याची बाजू तुम्हाला सचिव सांगतील. "ज" चा प्रस्ताव कोणाचा आहे ते सुचक होते.

दिनेश जैन :-

ह्या विषयी अनुमोदकला अधिकार आहेत.

जुबेर इनामदार :-

तुम्ही बोलता अधिकार आहेत. सचिवांना बोलू द्या. कायद्याची बाजू मांडू द्या.

दिनेश जैन :-

जोपर्यंत अनुमोदक देणार नाही तोपर्यंत तुम्हाला प्रस्तावच देता येणार नाही.

मा. महापौर :-

ह्याविषयी सचिव साहेब उत्तर देतील.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 110 पुरक घोषणेमधील हा धृवकिशोर पाटील यांनी जरी पत्रान्वये प्रस्ताव दिलेला असला तरी त्यामध्ये दिनेश जैन यांनी अनुमोदक दिलेले आहे. तर सुचक आणि अनुमोदक ह्या दोघांपैकी कोणीही त्याच्यावरती बोलू शकतात. चर्चा करु शकतात.

जुबेर इनामदार :-

सचिव महोदय, माझी कदाचित माहिती कमी आहे तुम्ही एल.एल.डी. केलेले आहेत.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य इनामदार साहेब मी आपल्याला संधी दिलेली आहे आपण बोला.

जुबेर इनामदार :-

मॅडम प्रत्येक सदस्याला बोलायची संधी द्या. माझे सन्मा. मित्र सभागृहनेते हे एक पाऊल मागे गेले मी त्यांचे अभिनंदन करु इच्छितो ह्या विषयावर.

मा. महापौर :-

तुम्ही बोला, तुम्हाला संधी दिलेली आहे तुमचा वेळ वाया जातो. 15 मिनिटे झाले अजून मुद्द्यावर आले नाहीत.

जुबेर इनामदार :-

सचिव महोदय, "ज" चा प्रस्ताव असतो त्याला अनुमोदकची गरज असते का असे मला दाखवा?

नगरसचिव :-

कोणताही प्रस्ताव मांडला की त्याला अनुमोदक आलाच ना.

जुबेर इनामदार :-

प्रस्ताव मांडणारा असा कुठे आहे का?

नगरसचिव :-

प्रस्ताव मांडला म्हणजे त्याला अनुमोदक आलाच ना. तुम्ही जेव्हा प्रस्ताव देता लिखितमध्ये.

जुबेर इनामदार :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये आहे का.

नगरसचिव :-

लिखीतमध्ये आपण प्रस्ताव दिलेला आहे त्याच्यावरती.

जुबेर इनामदार :-

डायसवर आल्यानंतर तुम्ही अनुमोदकाचा नाव देता का? फक्त प्रस्ताव ज्यांनी दिला त्याचे नाव देता.

नगरसचिव :-

प्रस्तावामध्ये नाव आहे ना.

मा. महापौर :-

त्यांनी त्यांचे बोलून झालेल आहे तुम्ही तुमचे म्हणणे मांडा. तुम्ही परिवनहच्या संदर्भामध्ये बोलणार आहेत ना?

जुबेर इनामदार :-

मी कायद्याच्या दायऱ्यामध्ये मांडण्याचा प्रयत्न करतो. माझा “ज” चा प्रस्ताव आहे तुम्ही थांबवू शकत नाही.

मा. महापौर :-

आम्ही कुठे थांबवतो आहे बोला सन्मा. गटनेते जर आपण असाच वेळ वाया घालवणार तर आपल्याला काही म्हणण मांडायचे राहील.

जुबेर इनामदार :-

आयुक्त महोदय, तुमचे लक्ष केंद्रीत करु इच्छितो, अर्थसंकल्प म्हणजे आकड्यांची बाजू, आता सत्तधाऱ्यांनी जमेल जितका म्हणजे तुम्ही दिलेला अर्थसंकल्प स्थायी समिती जमेल तितका त्याचा मी मराठी आणि इंग्रजीचे अनुवाद हे बघत होतो. ट्रान्सलेशन लंग्सला काय बोलतात तर फुफ्फुस. तो फुफ्फुस फुगेपर्यंत तर छाती फाटेपर्यंत तो अर्थसंकल्प फुगवलेला आहे. इतका वारा भरला आहे त्याच्यामध्ये असे बोलतात ना साहेब, लातो का हिसाब करोडो की भूल चोपडा खोला तो मुद्दल भी भूल. असा प्रकार होणार आहे ह्या विषयाचा परिवहनमध्ये आपण 2020-21 ला काही करु शकलो नाही. करोना काळ होता म्हणून सुधारीत विशेष काही जास्त राहिला नाही. 2019 मध्ये त्यांना नविन ठेकेदाराला ठेका दिलेला आहे. परिवहन उपक्रम चालविण्यासाठी, आयुक्त महोदय आपल्याकडे VGF पध्दतीने ती प्रणाली आखली आहे. NCC तत्त्वावर प्लस VGF Viability Gap Funding परंतु त्या VGF चा कुठेही आकार म्हणजे फक्त पालिकेने पैसा द्यायचा मग तो का द्यायचा, किती द्यायचा, काय आपले नुकसान काय तोटा झालेला आहे. म्हणजे तिकीट हा विक्री जो आहे थोडक्यात तिकीट विक्री त्या ठेकेदारांनी करायची देखरेख त्यांनी करायची, इंधन त्याचा, चालक त्याचा, निरिक्षक त्याचा, विमा कर सगळ काही त्यांनी भरायचं आणि आपण त्याला 28 रुपये प्रती कि.मी. आपण त्याला देणार अस ठरलेलं आहे. निश्चित तरी तिकीट आपण कस छापतो. आपल्याला म्हणजे सभागृहाला याची माहिती देणे गरजेचे आहे की तिकीट आपण छापले किती रुपयाचे तिकीट छापून त्याला दिले होते त्यांनी किती रुपयाचे तिकीट विकले कारण सरसकट आपण त्याला 26 कोटी रुपये पालिका आपल्याला सबसीडी 20 कोटी रुपये हस्तांतर करावे लागत आहे. मूळ बजेटमधून आपल्याला 20 कोटी रुपये हस्तांतर करावे लागतील आणि 26 कोटी रुपये जे त्याला VGF funding करावे लागणार आहेत पुढच्या वर्षामध्ये गेल्या वर्षामध्ये आपण 25 ठेवले होते. 17 कोटी फक्त लागणार आहेत कारण तेवढा की देयक पडला नाही. कोरोना कोविडमुळे म्हणजे आयुक्त महोदय मला हा अर्थसंकल्प देताना हा अधिकाऱ्यांनी व्यवस्थापकांनी ह्याचा कुठेच उल्लेख केलेला नाही महापौर मॅडम, किती रुपयाचे तिकीट ठेकेदारांनी विकलेली आहे, कुठेतरी उत्पन्नाचा भाग आहे. उपमहापौर साहेब त्याचा कुठेतरी उल्लेख तर पाहिजे. आम्ही ह्या विषयासाठी पदाधिकाऱ्यांची आणि गटनेत्यांची बैठक लागली होती त्याच्यामध्ये आम्ही चर्चा करुन ज्या पध्दतीने चालायची ही चांगली पध्दत आहे ही आम्ही आयुक्तांची म्हणजे प्रशासनाची पाठ थोपटली मात्र तरी अर्थसंकल्पामध्ये कुठेतरी त्याचा उल्लेख असणं गरजेचे आहे हे कसे समजेल हे त्याला नुकसान तोटा पालिकेला काय कारणामुळे होतो आहे. तिकीटाची विक्री, दर

कमी की असलेला मेनटेनन्स हे कुठेतरी साहेब आपल्याला स्पष्ट होणे गरजेचे होते. म्हणून माझी आपणाला विनंती राहील की याचे स्पष्टीकरण प्रशासनाने आज ह्या सभागृहामध्ये द्यावे. जेणेकरुन हा अर्थसंकल्प असा ट्रान्सपरन्ट हा सिध्द होईल आणि अशाप्रकारे पालिकेची परिवहन समितीची परिस्थिती आहे. कारण वर्षात एकदा तो सभागृहाच्या समोर अशाप्रकारे जाणार की परिवहन उपक्रम आम्ही अशाप्रकारे चालवतो. तोट्यात चालवतो. तोट्यातच चालणार त्याला आपल्याला पालिकेला पैसे भरावेच लागणार आणि त्याचे नुकसान भुर्दंड भरावा लागेल कारण ती सोय आहे आणि ती सोय आपण सेवा म्हणून लोकांना देत आहोत. त्याची माहिती कोण देईल. त्याची माहिती सभागृहामध्ये अशाप्रकारे अर्थसंकल्पामध्ये दिली पाहिजे. ही माझी पूर्ण परिवहन अर्थसंकल्पामध्ये हा माझा एक प्रमुख मुद्दा आहे की आयुक्त महोदय ह्या विषयावर आपण निवेदन करावं की खरी परिस्थिती आपली काय आहे? आजच्या तारखेला धन्यवाद.

दिनेश जैन :-

महापौर मॅडम पहिले तो मैं स्थायी समिती सभापती और सभी स्थायी समिती सदस्योओ का बहुत बहुत धन्यवाद करता हूँ की, इतना सुंदर बजेट उन्होंने बनाया है और महासभा को सुपुर्द किया आज मिरा भाईंदर को विकास की दृष्टी से लेके जाने के लिए दुरदृष्टी का परिचय दिया है और रही परिवहन के बजेट की बात तो जुबेर इनामदारजीने बोला है की फुगाया फुगाया फुगाया परिवहन में तो मुझे कुछ फुगाया हुआ एक रुपया भी दिख ही नही रहा जो आयुक्त का बजेट है वही बजेट है| अपना स्थायी समिती का क्योंकी स्थायी समिती की जब मिटींग लगती है उसके अंदर वो लोग बहुत बारीकी से डिसकशन करते है| उनको लगता है की इस बजेट में नही फुगाना चाहिए तो उन्होंने एक रुपया भी नही फुगाया आप देखीए जो आयुक्त ने दिया सेम टू सेम दिया हुआ है फिर भी सभागृह को गुमराह करने का नया सदस्यो का क्या मतलब और दुसरी बात अभी मेरी बार चल रही है, गुमराह करने का और दुसरी बात यह है की 20 कोटी नही भेजा है, 22 कोटी दिया हूँआ है| वो उनकी मिस्टेक है और एक बाजू हम बार बार तक्रार करते है की मिरा भाईंदर के अंदर परिवहन सेवा अच्छी होनी चाहिए उत्तन के लोगो को इतनी तकलीफ होती है, उनको इतनी तकलीफ होती, हम कम्पलेंट करते है महापौर मॅडम को, आयुक्त को की सुविधा अच्छी होनी चाहिए लेकिन बजेट नही होना चाहिए तो कैसे होगा मॅडम बजेट होगा तभी सुविधा होगी तो यह जो बजेट बनाया है, आयुक्त साहेबने जो दिया बहुत ही सुंदर बजेट है और उसके उपर स्थायी समितीने चर्चा करके उसको फायनल किया है| मतलब यह जो बजेट दिया है, वो काफी व्यवस्थित दिया है और हेड टू हेड चर्चा होती है वहाँ पे और कोई भी आजतक महासभा ऐसी नही लगी है पुरे महाराष्ट्र में की जब 3-3 दिन तक बजेट चले| में महानगरपालिका की बात कर रहा हूँ विधानसभा की बात नही कर रहा हूँ| क्योंकी यहाँ पे ना आज 30 तारीख है अगर 31 तारीख के पहले बजेट फायनल करना है तो कैसे तीन दिन होते है| मा. स्थायी समितीने मंजुर केलेल्या सन २०२१-२२ चे सुधारित व सन २०२२-२३ चे परिवहन विभागाचे अंदाजपत्रकात लेखाशिर्षनिहाय तरतुदी मध्ये दुरुस्त्या करुन सन २०२१-२२ चे सुधारित व सन २०२२-२३ चे रक्कम रु. २५.५३ लक्ष इतक्या शिलकेच्या अंदाजपत्रकास आजची मा. महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

| **तपशिल** | 2021-22 (सुधारित अंदाज) | 2022-23 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| परिवहन जमा (हस्तांतरणा सहित) | 5473.21 | 4674.23 |
| परिवहन खर्च | 5148.18 | 4648.70 |

| अखेरची शिल्लक | 325.03 | 25.53 |
|---|---|---|

सिमा शाह :-

माझे अनुमोदन आहे.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, हा तुम्ही एकत्र क्लब केलेला ठराव आहे ना. परत तुम्ही वाचणार नाही ना दुसरा ठराव. परिवहनचा ठराव आहे आम्हालाही त्याची कल्पना आहे, मी परिवहनवरच भाषण केलं मी ठराव करताना एकत्र बोललो फुगवलेला बजेट पूर्ण अर्थसंकल्प बोललो, परिवहन बोललेलो नाही. ह्या विषयावर आयुक्तांना विनंती केलेली आहे. ठरावाचे वाचन करतो. मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सेवेचे सन २०२१-२२ चे सुधारित व सन २०२२-२३ चे मूळ अंदाजपत्रकास परिवहन व्यवस्थापक यांनी शिफारस केलेल्या जमे व खर्चाच्या बाजूमध्ये शुल्कातून उत्पन्न दर्शविले नाही. VGF प्रणाली मधून महापालिकेला 26 कोटी खर्च 2022-23 महापालिकेच्या तिजोरीवर पडणार याबाबत स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. प्रशासनाची ही भूमिका संभ्रम व शंका निर्माण करणारी आहे.

तरी सदर प्रस्तावाची विभागीय चाचपणी करावी व मा. आयुक्तांनी विशेष समिती त्यात पदाधिकारी, सर्व पक्षिय गटनेता तसेच खाजगी ऑडीटर नेमून अर्थसंकल्पातील त्रुटी दूर करावी असा मी ठराव मांडत आहे.

धनेश पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

दोन ठराव आलेले आहेत मतदान घेण्यात यावे.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 107 करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव आहे सुचक श्री. दिनेश जैन, अनुमोदन श्रीम. सिमा शाह. दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार, अनुमोदन श्री. धनेश पाटील. दोन ठराव आले असल्याने मतदान घेण्यात येत आहे. प्रथम मी दुसरा ठराव मतदानास घेतो. सुचक श्री. जुबेर इनामदार यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. दिनेश जैन यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य श्री. दिनेश जैन यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने 52, विराधात 24, तटस्थ 4 इतकी मते पडलेली असून मी दिनेश जैन यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. 107, 110, 113 :-**

परिवहन सेवेचे सन २०२१-२२ चे सुधारित व सन २०२२-२३ चे मूळ अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १४/०३/२०२२ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. १८६, ठराव क्र. १५६)

**ठराव क्र. 85 :-**

मा. स्थायी समितीने मंजुर केलेल्या सन २०२१-२२ चे सुधारित व सन २०२२-२३ चे परिवहन विभागाचे अंदाजपत्रकात लेखाशिर्षनिहाय तरतुदी मध्ये दुरुस्त्या करुन सन २०२१-२२ चे सुधारित व

सन २०२२-२३ चे रक्कम रु. २५.५३ लक्ष इतक्या शिलकेच्या अंदाजपत्रकास आजची मा. महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

| तपशिल | 2021-22 (सुधारित अंदाज) | 2022-23 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| परिवहन जमा (हस्तांतरणा सहित) | 5473.21 | 4674.23 |
| परिवहन खर्च | 5148.18 | 4648.70 |
| **अखेरची शिल्लक** | **325.03** | **25.53** |

**सुचक :- श्री. दिनेश जैन          अनुमोदन :- श्रीम. सिमा शाह**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | १ | पाटील धनेश परशुराम | १. कासोदारिया अश्विन शामजीभाई |
| २ | गेहलोत हसमुख मोहनलाल | २ | भोईर राजू यशवंत | २. भट दीप्ती शेखर |
| ३ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | ३. पाटील अनिता जयवंत |
| ४ | वैती चंद्रकांत सिताराम | ४ | नलावडे दिनेश दगडु | ४. अहमद साराह अकरम |
| ५ | पाटील प्रभात प्रकाश | ५ | शिर्के अनंत गेणू | |
| ६ | सिंह मदन उदितनारायण | ६ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| ७ | भानुशाली वर्षा गिरधर | ७ | घरत तारा विनायक | |
| ८ | यादव मिरादेवी रामलाल | ८ | कदम अर्चना अरुण | |
| ९ | शाह रिटा सुभाष | ९ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १० | गोहिल शानू जोरावर सिंह | १० | गुप्ता कुसुम संतोष | |
| ११ | भोईर सुनिता शशिकांत | ११ | भोईर भावना राजू | |
| १२ | पाटील वंदना मंगेश | १२ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १३ | सोंस नीला बर्नाड | १३ | पाटील वंदना विकास | |
| १४ | रावल मेघना दिपक | १४ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| १५ | मोकाशी दिपाली आनंदराव | १५ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| १६ | जैन सुनिता रमेश | १६ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| १७ | अरोरा दीपिका पंकज | १७ | सावंत अनिल दिवाकर | |
| १८ | नाईक विविता विवेक | १८ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| १९ | भावसार वंदना संजय | १९ | शेख रुबीना फिरोझ | |
| २० | बेलानी हेमा राजेश | २० | डिसा मर्लिन मर्विन | |
| २१ | भोईर विणा सुर्यकांत | २१ | परदेशी गिता हरीश | |
| २२ | सोनार सुरेखा प्रकाश | २२ | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | |
| २३ | मुखर्जी अनिता बबलू | २३ | पाटील नरेश तुकाराम | |
| २४ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २४ | जैन गीता भरत | |
| २५ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| २६ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| २७ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| २८ | शेट्टी अरविंद आनंद | | | |
| २९ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३० | तिवारी अशोक सूर्यदेव | | | |
| ३१ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | | | |
| ३२ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| ३३ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ३४ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३५ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३६ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३७ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ३८ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ३९ | थेराडे संजय अनंत | | | |
| ४० | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ४१ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ४२ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ४३ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ४४ | भोईर गणेश गजानन | | | |
| ४५ | पारधी सुजाता यशवंत | | | |
| ४६ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ४७ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |
| ४८ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ४९ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ५० | खंडेलवाल सुरेश जगदीश | | | |
| ५१ | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |

**ठराव बहूमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 108, अग्निशमन विभागाचे सन २०२१-२२ चे सुधारित व सन २०२२-२३ चे मूळ अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १४/०३/२०२२ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. १८७, ठराव क्र. १५७)

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, ह्या ही विषयामध्ये धृवकिशोर पाटील यांनीच मांडलेला आहे तर ह्यामध्ये अनिल विराणी अनुमोदक आहेत. तर जी चर्चा होईल किंवा ठराव मांडतील ते अनिल विराणी मांडणार आहेत.

जुबेर इनामदार :-

आता याच्या आधी आम्ही विषय मांडला तुम्ही बोलला की ठराव मांडा आम्ही ठराव मांडला. आम्ही आयुक्तांना निवेदन करायची विनंती केली तुम्ही काय करु दिले नाही. आज प्रशासनाने बोललं पाहिजे.

मा. महापौर :-

आज तुम्ही सदस्यांना बोलायची संधी देणार आहे.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, त्याला उत्तर कोण देणार?

मा. महापौर :-

आज बजेटची मिटींग आहे त्यामुळे आज उत्तरं कशाला पाहिजे. तुम्हाला बजेटवरती बोलायचं आहे.

जुबेर इनामदार :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 100 आयुक्त बजेट पहिले सादर करतात म्हणजे प्रशासनाचा बजेट, स्थायी समितीमध्ये जाणार, स्थायी समिती महासभेसमोर आणणार याचा अर्थ प्रशासनाची प्रमुख भुमिका उत्तर देणार प्रशासन असतो महापौर मॅडम.

मा. महापौर :-

प्रशासनाने बजेट दिल ना, स्थायी समितीला तुमचे पण सदस्य आहेत. मग स्थायी समितीमध्ये का विचारले नाही.

जुबेर इनामदार :-

महासभेच्या चर्चेमध्ये “ज” चा प्रस्ताव अंतर्गत माझ्या अधिकारात मी त्यांना विनंती केली की त्यांनी त्यांचे निवेदन करावं कारण हाऊस तुम्ही चालवला, सभागृहाचे प्रमुख तुम्ही, खरतर ही एक प्रथा आहे की आयुक्तांनी ही महापौरांची परवानगी घेऊनच सभागृहामध्ये बोललं पाहिजे बरोबर आहे तुम्हाला तो सन्मान आहे, महापौर मॅडम त्या सन्मानाचा वापर तुम्ही चांगल्या दृष्टीकोनातून करा. येऊ द्या ना प्रशासनाकडून उत्त्र.

मा. महापौर :-

नक्की मी करणार, परंतु आज ही बजेटची मिटींग असल्या कारणाने आपण मला असे वाटते की आज सदस्यांना बोलायचा दिवस आहे आणि पूर्णपणे तुम्हाला बोलायची संधी प्राप्त झालेली आहे. तुम्हाला नसेल बोलायचं हरकत नाही.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, आम्हाला बोलायचं आहे आम्ही तर आज खिंड लढवणार आणि ती लढवताना मला मा. भूतपूर्व प्रधानमंत्री स्व. अटल बिहारीजी आठवले. त्यांची एक चांगली कविता आहे. क्या हार में क्या जीत में किंचीत नही भयभित में कर्तव्य पथपर जो मिला यह भी सही वो भी सही, वरदान नही मांगूंगा हो कुछ पर हार तो नही मानूंगा| आमचे प्रत्येक शब्द घ्या. आयुक्त महोदय चांगला विषय आहे. अग्निशमन विषय चांगला बजेट तुम्ही प्रस्तावित केलेला आहे. तुमचे अभिनंदन आहे. जास्त काही त्याच्यामध्ये त्रुट्या काढू शकलो नाही मात्र एक कुठेतरी मला पटलं नाही म्हणून मी तुमच्याकडे येतो आणि माझी अपेक्षा आहे महापौर मॅडम आयुक्तांना त्या विषयावर निवेदन किंवा त्याची प्रतिक्रिया देऊ द्या म्हणजे स्पष्ट होते प्रशासनाची भूमिका कारण आयुक्तांनी आपली भूमिका अर्थसंकल्प अग्निशमनचा देताना त्यांनी आपली भुमिका स्पष्ट केलेली आहे. आयुक्त महोदय पान क्र. 5 लेखाशिर्षक अग्निशमन भांडवली, भांडवली म्हणजे तुमचा कॅपीटल तुमचा जो पालिकेचा कॅपिटल इनकम त्या कॅपीटल इनकमचा 7 वा अनुक्रमांक बांधकाम विभागात निधी हस्तांतर करणे 10 कोटी रुपये अग्निशमनचा विभागाचा पैसा बांधकाम विभागाकडे वर्ग, एवढी मोठी भुमिका म्हणजे स्थायी समितीने कदाचित त्यांची ती भूमिका आहे त्यांनी घेतली असेल परंतु आयुक्त महोदय तुमच्याकडे अधिकार भरपूर आहेत. त्या अधिकारात मला वाटते आजच माध्यमांमध्ये वाचलं आहे होर्डिंग्ज बद्दल केलेले 451 अंतर्गत प्रशासनाने मांडलेली भूमिका तत्कालीन आयुक्त गिते साहेबांनी तो प्रकार केला होता. त्यांनी आपली भूमिका मांडलेली होती आणि शासनाने ते मंजूर करुन पाठवले की फक्त 10

टक्के नैसर्गिक वाढ होणार. केलेला ठराव तो रद्द केला आणि आज तो होर्डिंग्जचा विषय जाहिरातीचा विषय आपल्या बाजूने पालिकेच्या प्रशासनाच्या बाजूने लागलेला म्हणजे अर्थात थोडक्यात प्रशासनाकडे अधिकार भरपूर आहेत. राज्य शासन तुमच ऐकेल कारण प्रशासनाची भुमिका आहे, आर्थिक बाबी प्रशासनाची बाजू असते महापौर मॅडम, स्थायी समिती चर्चा करते, चर्चा केली पाहिजे. शहराच्या हितामध्ये त्यांना जे योग्य वाटेल ते निर्णय घेतले जातात. परंतु एका विभागाचा पैसा दुसऱ्या विभागाकडे साहेब महापौर मॅडम, डिसेंबरमध्ये पुर्न:नियोजन करता येतो. आहे ना वैती साहेब म्हणजे आयुक्त साहेब पुर्ननियोजनचा विषय आहे आता शिल्लक राहिले असते पैसे अग्निशमनमध्ये काम नाही, खर्च नसला तर डिसेंबर महिन्यामध्ये पुर्ननियोजन करता येते. मा. महासभेची मंजुरी घेऊन ते ही स्थायी समितीला अधिकार नाहीत. मा. महासभेसमोर विषय आणावा लागतो. कारण एका विभागाकडून दुसऱ्या विभागाने घेऊन जायचा असेल तर त्याला मा. महासभेची मंजुरी लागते. तर ते आता सुरुवातीलाच आयुक्त महोदय मी तुमच्या निदर्शनास हा विषय आणलेला आहे. मला त्याची कल्पना आहे चांगली की कदाचित महापौर मॅडम तुम्हाला ती संधी देणार नाही ते बोलले की तुम्ही बोलायचे आहे. आज फक्त मी खिंड लढवायची म्हणून ठीक आहे मी हा विषय आयुक्त महोदय तुमच्या निदर्शनास आणून दिलेला आहे. अग्निशमनचा याच्यामध्ये दुरुस्ती करणे गरजेची आहे. असा कुठलाही निधी पुर्ननियोजनाशिवाय विभागीय बद्दल करता येत नाही. तुम्ही त्यांचा ठराव होऊ द्या नंतर माझा ठराव आहे. बरेच सदस्य आहेत त्यांना त्या विषयावर चर्चा करायची आहे. विषय करायचा असेल किंवा आहे ह्यासाठी घेण्यात यावी. सन्मा. सदस्य त्यांनी आपापली भुमिका आपापल्या स्थानी प्रशासनासमोर आणल्या एकच होणार आहे.

मा. महापौर :-

तुमच्या विनंतीला मान देऊन मी त्यांना संधी देईल.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, माझे असं म्हणणे आहे आदरणीय जुबेर इनामदार साहेबांनी आपली चर्चा केलेली आहे. आपण आता त्यांच्या विनंतीला मान ठेवून आयुक्त साहेबांना सांगितले आहे त्यांना ही बोलू द्या. पण महापौर मॅडम हे बोलत असताना बोलणं झाल्यानंतर ह्यांनी त्यांची चर्चा झाली आहे तर त्यांनी ठराव मांडावे पहिले, नंतर आम्ही ठराव मांडणार.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम धन्यवाद. मगाशी बरेचसे अभिनंदनाचे ठराव झाले आहेत त्यामध्ये मा. आयुक्त साहेबांचे अभिनंदन आहेच त्याबरोबर ते अधिकारी आहेत. स्टाफ आहेत तरी सुध्दा फिल्डवर कोविड काळामध्ये बरचसं काम केलेलं आहे त्यानंतर ह्या कोविड काळामध्ये आमच्या महापालिकेमध्ये डांगे साहेब, डॉ. राठोड यांनी सुध्दा चांगलं कॉन्ट्रीब्युशन दिलेला आहे त्यांच्या कार्यकाळामध्ये त्यांचा सुध्दा ह्याठिकाणी अभिनंदन. महापौर मॅडम बऱ्याच वर्षापासून जी प्रथा आहे कोणी काढली, कशी काढली मला माहिती नाही. बजेटसारखी मिटींग आहे त्याची प्रोसिडींग दिली जात नाही.

नगरसचिव :-

स्थायी समितीची लिहिली जात नाही, महासभेची लिहिली जाते.

अनिल सावंत :-

ते आयुक्त साहेब मला वाटते अग्नि निरिक्षण शुल्क परवाना जो आपण एका वर्षासाठी इमारती ज्या आठ माळ्याच्या वरतीच्या आहेत. ज्यांना लिफ्ट नसतील त्यांना त्याच्यामध्ये बराचसा स्कोप आहे. अजूनही आपला इनकम त्या ठिकाणी वाढू शकते बऱ्याचशा इमारती परवाना घेतलेल्या आहेत आणि परवाना रिन्यूव्ह करत नाही. दुसरी गोष्ट त्याच्या खर्चामध्ये नविन फायर फायटर खरेदी 21 करोड प्रस्तावित आहेत आयुक्त साहेबांनी 20 करोड केले होते. गेल्या वर्षी 2021-22 ला 20 करोड होते ते अजूनपर्यंत खर्च पडलेले नाहीत. आपण एक 45 करोडची फायर फायटर मशीन घेतली

होती. त्याचा दुमधडाक्यामध्ये उद्घाटन झालं होतं त्या मशिनच काय झालं. कारण त्याच्या दुसऱ्याच दिवशी ती गेली जर्मनीला परत ती आली का नाही. काय परिस्थिती आहे.

मा. महापौर :-

ती मशीन आलेली आहे. तुम्हाला सुचना काय मांडायची ती सांगा फक्त.

अनिल सावंत :-

मगाशी जो रिप्रोप्रिएशनचा विषय आहे त्याला सुध्दा आमचे ऑब्जेक्शन आहे. फायर ब्रिगेडच्या बजेटमध्ये ह्या डिपाट्र्मेंटमधून त्या डिपार्टमेंट करु शकत नाही. अग्निशमन सरखा विषय आहे.

रिटा शाह :-

धन्यवाद मॅडम. प्रकरण क्र. 110 बद्दल पण तुम्हाला विचारलं होतं की मला बोलायचं आहे. त्याच्यानंतर ठराव झाला आता हा ही ठराव झाला परंतु मॅडम ह्या पत्रामध्ये असं लिहिलेल आहे ठिक आहे दुसऱ्याचा ठराव नाही झालेला आहे की, स्थायी समिती सभा 14/03/2021 रोजी शिफारस केलेले प्रकरण क्र. 185, ठराव क्र. 156 ह्यावर फक्त मी पत्र दिलेले आहे. स्थायी समितीमध्ये जे मेंबर आहेत त्यांना माहिती आहे काय ठराव झाले. गटनेता वगैरे त्यांना माहिती आहे. सभागृहनेता त्यांना माहिती आहे काय ठराव झाले परंतु ह्या नगरसेवकांना माहित नाही स्थायी समितीमध्ये काय ठराव झाला तर ठरावाची प्रत द्यायला पाहिजे होती. दुसरा मुद्दा असा आहे इथे उपस्थित झाला की आयुक्त साहेबांनी जो काही बजेट परिवहनचा दिला ॲज इट इज त्यांनी स्थायी समितीमध्ये दिला आहे. स्थायी समितीने ॲज इट इज महासभेमध्ये दिलेला आहे. मग महासभेमध्ये ॲज इट इज आलेला आहे मग “ज” चा प्रस्तावाची गरज काय? त्याच उत्तर प्रशासनाने द्यावे.

नगरसचिव :-

आपण जे आता सांगितलं स्टॅन्डिंगचा जो ठराव की जे प्रकरण 101,108,109 मध्ये आपण म्हटले आहे कंसामध्ये मा. स्थायी समिती सभा दि. 14/03/2022 रोजीचे शिफारस केलेले प्रकरण क्र. 186, ठराव क्र. 156  परिवहनचा आहे. अग्निशमनचा पण तसाच आहे. मूळ पण आहे. आपल्याला जे बजेट कॉपी दिलेली आहे त्याच्यामध्ये पहिल पान बघा ठराव जोडलेला आहे.

रिटा शाह :-

तेवढेच ठराव आहेत का? मग काय फेरबदल केलं काय डिटेलमध्ये झालं ते आम्हाला काहीच माहित नाही पडत.

नगरसचिव :-

अंदाजपत्रकात आहे.

रिटा शाह :-

आणि जेव्हा तुम्ही मान्य करतात की आयुक्त साहेबांनी दिलेलं ॲज इट इज आपण स्थायी समितीमध्ये केलं आणि स्थायी समितीने ॲज इट इज महासभेत आलेला आहे. मग ज च्या प्रस्तावामध्ये तुम्ही काय फेरबदल करत आहेत.

अनिल विराणी :-

मा. स्थायी समितीने मंजुर केलेल्या सन २०२१-२२ चे सुधारित व सन २०२२-२३ चे अग्निशमन विभागाचे अंदाजपत्रकात लेखाशिर्षनिहाय तरतुदी मध्ये दुरुस्त्या करुन रक्कम रु. १५.५० लक्ष इतक्या शिलकेच्या अंदाजपत्रकास आजची मा. महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

| **तपशिल** | **2021-22 (सुधारित अंदाज)** | **2022-23 (मुळ अंदाज)** |
|---|---|---|
| एकुण जमा | 5244.47 | 5934.50 |

| | | |
|---|---|---|
| एकुण खर्च | 4943.00 | 5919.00 |
| **अखेरची शिल्लक** | **301.47** | **15.50** |

दिनेश जैन :-

माझे अनुमोदन आहे.

गिता जैन :-

महापौर मॅडम जर आयुक्त उत्तर देत नसेल तर मा. स्थायी समितीचे सभापतीने उत्तर द्यावे कारण त्यांनी जे दिलेले आहे पॉईंट ते माझं ही पुकारलेलं पॉईंट तेच होते की असा हस्तांतर करु शकत नाही तर जे कुठल्या कायद्यामध्ये कुठले कलममध्ये केले आहे ते जर स्थायी समितीचे सभापतीने उत्तर दिले तरी चालेल. बाकी तर पहिलाच सेन्टेन्स होतं जुबेर भाईचे फुफ्फुस सारखा फुगवलेला ते खरं आहे म्हणजे इथे मी जेव्हा आकडे बघते तेव्हा आपण एखढे फुगवलेले बजेट कशामुळे का म्हणून एक गृहित धरले आहे की आपला एवढा इनकम होणार किंवा आयुक्तांनी जे अंदाज दिला आहे त्यापेक्षा डब्बल कुठे कुठे दाखवलेलं आहे. तर त्याचे ही मला वाटते का स्थायी समिती सभापतीने आम्हाला उत्तर द्यावं की त्यांना का असे वाटते की एवढी इनकम होणार. जेव्हा एवढ्या वर्षाचा आपला रेकॉर्ड आहे की एवढा होत नाही जमा तरी त्यांनी जे अंदाज मांडलेले आहे त्यावर त्यांचे वक्तव्य पण मला जर दिलं तर बरं होईल.

जुबेर इनामदार :-

मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन विभागाचे सन २०२१-२२ चे सुधारित व सन २०२२-२३ चे मूळ अंदाजपत्रकास मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी शिफारस केलेल्या जमे व खर्चाच्या बाजूमध्ये कुठलाही बदन न करता मा. आयुक्त यांचे प्रस्तावित अंदाजास ही सभा मान्यता देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

धनेश पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 108,111 आणि 114 अशा एकत्रित केलेल्या प्रकरणावरती दोन ठराव प्राप्त झालेले आहेत. पहिला ठराव आहे सुचक श्री. अनिल विराणी, अनुमोदन श्री. दिनेश जैन. दुसरा ठराव आहे सुचक श्री. जुबेर इनामदार, अनुमोदन श्री. धनेश पाटील. प्रथम मी दुसरा ठराव मतदानास घेतो. सुचक श्री. जुबेर इनामदार यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. अनिल विराणी यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य श्री. अनिल विराणी यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने 51, विराधात 24, तटस्थ 4 इतकी मते पडलेली आहेत. सन्मा. सदस्य श्री. अनिल विराणी यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. 108, 111, 114 :-**

अग्निशमन विभागाचे सन २०२१-२२ चे सुधारित व सन २०२२-२३ चे मूळ अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १४/०३/२०२२ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. १८७, ठराव क्र. १५७)

**ठराव क्र. 86 :-**

मा. स्थायी समितीने मंजुर केलेल्या सन २०२१-२२ चे सुधारित व सन २०२२-२३ चे अग्निशमन विभागाचे अंदाजपत्रकात लेखाशिर्षनिहाय तरतुदी मध्ये दुरुस्त्या करुन रक्कम रु. १५.५० लक्ष इतक्या शिलकेच्या अंदाजपत्रकास आजची मा. महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

| तपशिल | 2021-22 (सुधारित अंदाज) | 2022-23 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| एकुण जमा | 5244.47 | 5934.50 |
| एकुण खर्च | 4943.00 | 5919.00 |
| **अखेरची शिल्लक** | **301.47** | **15.50** |

**सुचक :- श्री. अनिल विराणी      अनुमोदन :- श्री. दिनेश जैन**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | १ | पाटील धनेश परशुराम | १. कासोदारिया अश्विन शामजीभाई |
| २ | गेहलोत हसमुख मोहनलाल | २ | भोईर राजू यशवंत | २. भट दीप्ती शेखर |
| ३ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | ३. पाटील अनिता जयवंत |
| ४ | वैती चंद्रकांत सिताराम | ४ | नलावडे दिनेश दगडु | ४. अहमद साराह अकरम |
| ५ | पाटील प्रभात प्रकाश | ५ | शिर्के अनंत गेणू | |
| ६ | सिंह मदन उदितनारायण | ६ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| ७ | भानुशाली वर्षा गिरधर | ७ | घरत तारा विनायक | |
| ८ | यादव मिरादेवी रामलाल | ८ | कदम अर्चना अरुण | |
| ९ | शाह रिटा सुभाष | ९ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १० | गोहिल शानू जोरावर सिंह | १० | गुप्ता कुसुम संतोष | |
| ११ | भोईर सुनिता शशिकांत | ११ | भोईर भावना राजू | |
| १२ | पाटील वंदना मंगेश | १२ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १३ | सोंस नीला बर्नाड | १३ | पाटील वंदना विकास | |
| १४ | रावल मेघना दिपक | १४ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| १५ | मोकाशी दिपाली आनंदराव | १५ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| १६ | जैन सुनिता रमेश | १६ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| १७ | अरोरा दीपिका पंकज | १७ | सावंत अनिल दिवाकर | |
| १८ | नाईक विविता विवेक | १८ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| १९ | भावसार वंदना संजय | १९ | शेख रुबीना फिरोझ | |
| २० | बेलानी हेमा राजेश | २० | डिसा मर्लिन मर्विन | |
| २१ | भोईर विणा सुर्यकांत | २१ | परदेशी गिता हरीश | |
| २२ | सोनार सुरेखा प्रकाश | २२ | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | |
| २३ | मुखर्जी अनिता बबलू | २३ | पाटील नरेश तुकाराम | |
| २४ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २४ | जैन गीता भरत | |
| २५ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| २६ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २७ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| २८ | शेट्टी अरविंद आनंद | | | |
| २९ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| ३० | तिवारी अशोक सूर्यदेव | | | |
| ३१ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | | | |
| ३२ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| ३३ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ३४ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३५ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३६ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३७ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ३८ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ३९ | थेराडे संजय अनंत | | | |
| ४० | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ४१ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ४२ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ४३ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ४४ | भोईर गणेश गजानन | | | |
| ४५ | पारधी सुजाता यशवंत | | | |
| ४६ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ४७ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |
| ४८ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ४९ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ५० | खंडेलवाल सुरेश जगदीश | | | |
| ५१ | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |

**ठराव बहूमताने मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 109, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०२१-२२ चे सुधारित व सन २०२२-२३ चे मूळ अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेबाबत. ("अ" + "क" + "महिला व बालकल्याण" + "अंध व अपंग" + "JNNURM" + "P" + "वृक्षप्राधिकरण" + "शिक्षण") (मा. स्थायी समिती सभा दि. १४/०३/२०२२ रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. १८८, ठराव क्र. १५८)

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो, सन्मा. सदस्य जुबेर इनामदार आपण चर्चा वर करणारच आहोत. महापौर मॅडम माझा ठराव आहे परंतु महापौर मॅडम आता विरोधी पक्षाने जर आमच्या अटल बिहारी वाजपेयी यांची कविता मांडली तर मग आम्ही म्हटलं तर कुठे वावग ठरणार

आहे आणि म्हणून छोटे मन से कोई बढा नही होता और टूटे मन से कोई खडा नही होता आणि जुबेर भाई आप मित्र बदल सकते पर पडोसी नही आणि म्हणून महापौर मॅडम ह्यावर चर्चा करत असताना ठराव वाचल्यामुळे मी मा. जुबेर साहेबांना सांगेल की अगोदर चर्चा होऊ द्या ह्यावर आणि नंतर मग आपण ठराव करु.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम बरेच सदस्य जे आमचे आहेत, शिवसेनेचे आहेत त्यांना आपआपली बाजू मांडायची आहे. त्यांना संधी देण्यात यावी. आता एक तासामध्ये सभा संपेल. बोलून बोलून किती बोलणार. माझा तर अधिकार आहे, गटनेता काय माझा ज चा प्रस्ताव आहे मी वैधानिक अधिकार घेऊन आलो. आता कस आहे प्रशांत दळवी साहेबांनी माझी चिमटी काढलेली आहे.

मा. महापौर :-

मग तुमच्या वतीने कोण बोलणार आहे.

जुबेर इनामदार :-

माझ्या वतीने नाही, माझ्या सोबत असलेल्या बाकीच्या सदस्यांना आपली भूमिका मांडायची आहे. परत मॅडम ऐका, मी चुकीच काही बोलत नाही कधी शब्दाचा प्रयोग एकदम व्यवस्थित करतो.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम ज्यांचा ज चा प्रस्ताव आहे त्यांना अगोदर आपले मत मांडू द्या. सचिव साहेब त्यांनी मांडाव ना आपलं मत.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम धन्यवाद. आजच्या महासभेमध्ये मॅडम चर्चा करायची आहे ती नक्की कुठल्या बजेटवर म्हणजे स्थायी समितीने दिलेल्या बजेटवर करायची आहे की महापालिका आयुक्तांनी दिलेल्या बजेटवर करायची आहे.

मा. महापौर :-

स्थायी समितीने दिलेल्या बजेटवरती चर्चा करायची आहे. आयुक्तांनी बजेट सादर केला स्थायी समितीला.

अनिल सावंत :-

गेल्या वर्षी स्थायी समितीने बजेट दिलं होतं. 2020-21 चा 2 हजार 62 करोड आणि त्याच जे सुधारित बजेट आलेला आहे. 2021-22 चा जे महापालिकेने काम केलेला आहे ते आहे 1398 करोड म्हणजे फरक किती झाला जवळ जवळ 800 करोडचा फरक गेल्या वर्षीच स्थायी समितीने जे बजेट मांडलं आणि ह्या वर्षभरामध्ये जे कामकाज झालं. त्याच्यामध्ये 800 करोडची तफावत आहे म्हणजे प्रशासन कुठल्या बजेटवर काम करतो. महापालिकेचा बजेटवर करते आहे. स्थायी समितीच्या बजेटवर करते आहे की जनरल बॉडीच्या बजेटवर करते आहे. गेल्या वर्षी सुध्दा स्थायी समितीचे जे बजेट होतं तेच जनरल बॉडीचा बजेट होतं. म्हणजे 2062 करोडचं आणि त्याचा सुधारीत दिलं आहे आता 1348 करोड हा 800 करोडचा फरक गेला कुठे? गेल्या 5 वर्षामध्ये जवळ जवळ नगरसेवकांनी स्थायी समितीने महासभेमध्ये जो बजेट सॅक्शन झाला त्याच्यामध्ये जवळ जवळ 4 हजार करोडची तफावत आहे मग जर प्रशासनाला आयुक्तांच्या बजेटवर काम करायचं आहे मग स्थायी समितीने करणार तीन दिवस चर्चा जनरल बॉडी करणार एक दिवस चर्चा मग फायदा काय? प्रशासन काय करणार आहे आपण चर्चा करतो, बजेट करतो गेल्या वर्षीच्या स्थायी समितीच्या सभापतींना वाटलं असेल की एवढा इनकम आहे 2062 करोड मग मार्चमध्ये सुधारित बजेट येतं कसं आणि एवढा फरक 800 करोडचा फरक आम्ही 10-20 टक्के समजू शकतो. मग ह्या 800 करोडची जी तफावत आहे त्याच्यामध्ये त्यांनी इनकम कमी झालं आहे हे बरोबर आहे मग त्यांनी त्यांचे ज्यावेळी वर्षभरामध्ये जी कामं

निघाली ती 2062 करोडची निघाली आहेत की 1398 करोडची निघाली आहेत याचा प्रशासनाने जवाब द्यावा.

मा. महापौर :-

ह्याच्या बद्दल सभापती महोदय त्याच्या भाषणामध्ये सांगणार आहेत.

अनिल सावंत :-

ह्या मुद्द्यावर सांगा. त्यानंतर मालमत्ता कर आयुक्तांनी अंदाज केला ह्यावर्षी 85 करोड आणि स्थायी समितीने केला 150 करोड ते मगाशी म्हणत होते ना फुगवला आहे कालपर्यंत म्हणजे काल 29 तारीख होती. 29 तारखेपर्यंत फक्त् 67 करोड मालमत्ता कर जमा झालेला आहे आणि त्याच्यामध्ये जी अभय योजना होती त्या अभय योजनेमुळे 10 करोड झालेले आहेत. मग आता ह्या दोन दिवसांमध्ये काय 20 करोड रुपया जमा होणार आहेत. स्थायी समितीने जे 150 करोड गृहित धरलेले आहेत ते कुठून आले? त्याचा एक जस्टीफिकेशन पाहिजे. मॅडम ह्या शहराचा मुलभूत आणि महत्त्वाचा प्रश्न मी सर्व फिगरवर जाणार नाही. काही जे ठराविक मुद्दे आहेत तेच चर्चा करतो. उत्तनचा घनकचरा प्रकल्प ज्याठिकाणी कचरा जमा होतो त्याच्यावर प्रक्रिया केली जाते. महापौर मॅडम 2022 पर्यंत ज्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी सौराष्ट्र जी कंपनी आहे तिला आपण 44.62 म्हणजे मला वाटते 2017 मध्ये वगैरे ठेका दिला असेल ह्या वर्षामध्ये जवळ जवळ 44.62 करोड रुपये आपण फक्त कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी दिलेले आहेत म्हणजे शहरामधून जो कचरा जमा होतो ज्याच्यावर प्रक्रिया करण्यासाठी त्याला 548 रुपये पर टन देण्यात येतं जी ॲग्रीमेंट झालेली आहे आणि त्याला आपण गेल्या चार वर्षामध्ये जवळ जवळ 44 करोड रुपये दिलेले आहेत. 44.62 एवढे पैसे जर आपण देणार असू आणि मला वाटते 2023 मध्ये 12 करोडच प्रोव्हीजन दिलेला आहे एवढे पैसे जर त्याला दिलेले आहेत, देणार असू तर मग आज उत्तनच्या डम्पींग ग्राऊंडवर 14 लाख मेट्रीक टन कचरा कसा जमा झाला. विल्हेवाट लागली पाहिजे होती त्याची जर आपण एवढे पैसे देतो आहे 548 रुपये पर टन पर डे फक्त प्रक्रिया करण्याचे वाहतूक खर्च नाही त्यांनी फक्त प्रक्रिया करायची आहे. त्यांनी जर कचऱ्यावर प्रक्रिया केली असेल तर हा एवढा मोठा 14 लाख मेट्रीक टन कचरा जमा कसा झाला याचा प्रशासनाने उत्तर द्यावं आणि हे 44 करोड रुपये जे दिलेले आहेत ते त्याला कशाचे दिलेले आहेत? बायोमायनिंगसाठी 2022 पर्यंत गेल्या चार वर्षामध्ये 18 करोड खर्च झाला आणि 2023 मध्ये 25 करोड बायोमायनिंगसाठी म्हणजे कचऱ्यावर बायोमायनिंग केल्यानंतर त्या कचऱ्याची दुर्गंधी निघून जाणार आणार डिकम्पोस्ट होणार तो किती टनावर बायोमायनिंग झाला मग त्यात जर आपण खर्च केले आहेत 18 करोड रुपये तर आज उत्तनची परिस्थिती काय आहे. लिचेड प्रक्रियासाठी त्यामधून जे कचऱ्यामधून जे लिचेड निघते त्याच्यावर आपण काहीच खर्च केलेले नाही म्हणजे त्या गोष्टीकडे आपण पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे लॅंड फिल्ड साईड आहे तिथे बनवायची होती. महासभेमध्ये स्टॅन्डिंगमध्ये सर्व ठराव झाले, वेळोवेळी ठराव झाले पण गेल्या चार वर्षामध्ये त्याच्यावर काहीच खर्च झालेला नाही. म्हणजे त्याठिकाणी लॅन्ड फिल्ड साईटवर सुध्दा आपण पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे. बजेटमध्ये सांगितलेले आहे 2019 पासून काही 6 महिन्यांपूर्वी ज्या ज्यावेळी प्रश्न महासभेमध्ये आले त्यावेळी आम्हाला सांगण्यात आलं की 90 टक्के काम अंडर ग्राऊंड सिवरेज सिस्टमचं 90 टक्के काम ह्या शहरामध्ये पूर्ण झालेला आहे पण आज मार्च 2022 पर्यंत एक ही नविन मल:निस्सारण वाहिनी ह्या शहरामध्ये जोडण्यात आलेली नाही. मग 90 टक्के काम पूर्ण कुठे झालं? करोडो रुपये आपण टॅक्सच्या माध्यमातून 2008 पासून ह्या बजेटमध्ये अजून एक रुपय ही नविन मल:निस्सारण वाहिनीसाठी जोडण्यात जमा झालेला नाही. म्हणजे नविन मल:निसारण वाहिनी जोडली गेलेली नाही. इन्कम शुन्य आहे म्हणजे मग आम्हाला महासभेमध्ये 90 टक्के काम पूर्ण असा शहरामध्ये 90 टक्के काम पूर्ण झालं असे सांगण्यात ज्यावेळी आलं आणि शिवाय एस.टी.पी. प्लान्ट चालू आहे म्हणून सांगण्यात आलं मग ह्या जोडण्या अजून का झाले नाहीत आणि त्याचं का इनकम पासून

महापालिकेला त्या फॅसिलिटीपासून नागरिक वंचित का राहिलेत? मॅडम याच्यामध्ये एक हेडींग आहे दिव्यांग, मतिमंद मुलांसाठी फिजिओथेरेपी महिला बालकल्याणचा विषय आहे. त्याच्यावर आपल्याला लक्ष देणे गरजेचे आहे ती सुविधा आपण शहरातील जे दिव्यांग किंवा मतिमंद असतील त्याच्यावर सुध्दा आपण एकही पैसा खर्च केलेला नाही त्याच्यामध्ये सुधारणा करुन ती फॅसेलिटी आपण ह्या शहरातील नागरिकांना मतिमंद किंवा दिव्यांग यांना देऊ शकतो. वृक्ष प्राधिकरणच्या बजेटमध्ये मूळ बजेटमध्ये तिवरांच्या झाडांच्या लागवडीसाठी 50 लाख रुपये खर्च केलेले आहेत. कुठे लावली झाडं ती जो खर्च पडला आहे ती झाड लावली कुठे? याचे हे कसे सविस्तर ज्यावेळी आपण एखादे गोष्टी करतो ते बजेटमध्ये हे सविस्तर आलं पाहिजे. मग आम्ही शहर सुशोभिकरण करण्यासाठी ह्या शहराला माचंगसाठी ही 50 लाखाची झाडं ह्या ठिकाणी लावली. विद्यार्थी गणवेश कोविड काळामध्ये आपण शिक्षकांचे पगार दिले, विद्यार्थ्यांना गणवेश बुट देऊ शकलो असतो आपण पुस्तके देऊ शकलो असतो त्याच्यावर सुध्दा 2019 ते 2022 शुन्य खर्च झालेला आहे. मालमत्ता कराचं मगाशी मी सांगितलं मालमत्ता कराचं नविन सर्व्हेक्षण करण्यासाठी आपण 2019 रोजी एक ठेका दिलेला आहे आणि त्याला आपण 545 रुपये पर सदनिका त्याला देणार आहोत म्हणजे जवळ जवळ 20-25 करोडचा तो ठेका आहे. दि. 1/12/2019 पर्यंत त्यांनी काम पूर्ण करणं अपेक्षित होतं ह्या वर्क ऑर्डरमध्ये आहे. म्हणजे 2019 मध्ये जर डिसेंबरमध्ये काम पूर्ण झालं असतं त्यावेळी कोविड पिरेड नव्हता, मार्चमध्ये सुरु झाला तर 2019-20 किंवा 2020-21 च्या इन्कममध्ये तो मालम्ता करामध्ये फरक पडला असता. 20 करोड आपण देऊन बसलो, 20 करोड दिल्यानंतर आज त्यांनी सर्व्हेक्षण किती केलेल आहे आणि त्यातून एक्स्ट्रा इनकम पालिकेला किती होणार आहे. पालिकेला जे अपेक्षित आहे जे जुन्या सर्व्हे प्रमाणे जे इनकम अपेक्षित आहे तेवढेच होत आहे. आपण फक्त त्याला 20-25 करोडचा ठेका देऊन बसलो आहेत. त्याच्यामध्ये सुधारणा काही नाही. अजूनही ते काम पूर्ण झालेलं नाही. याच्यावर लक्ष देण्याची गरज आहे. बाजार फी आपण करतो नोव्हेंबर 2021 पर्यंत शुन्य जमा झालेली आहे त्यानंतर ह्या 4 महिन्यांमध्ये प्रशासन कसे करणार आहे माहित नाही. 2023 साली त्यांनी 8 करोड म्हणजे ह्या शहरामध्ये हळू हळू वाढत वाढत कुठेतरी फेरिवाल्यांना आपण प्रोत्साहन देत आहोत. बाजार फी वाढवून ठेकेदार आपल्या खिशातून भरणार नाही, ज्यावेळी त्याला 8 करोड पालिकेला द्यायचे असतील त्यावेळी कमीत कमी 15 ते 20 करोड रुपये कमवणार आणि त्या मानाने किती फेरिवाले होतील ह्या शहरामध्ये. त्याचा प्रशासनाने गांभीर्यपूर्वक विचार करावा. इमारत विकासक 2022 मध्ये 150 करोड आणि 2023 मध्ये 250 करोड इमारत विकासक हा शहरातील महत्तवाचा जिव्हाळा विषय आहे. 2011 च्या शेसन्समध्ये ह्या शहराची लोकसंख्या होती साडे आठ लाख आणि हे 79 स्क्वेअर कि.मी. मध्ये हा शहराचा पसारा आहे. त्याचे फक्त 30 टक्के जमिनीवर आपण रेसिडेन्शीअल कॉम्पलेक्सच विकास करु शकतो हे शहर फक्त वर्ड हेल्थ ऑर्गनायझेशनच्या हिशोबाने 8 लाख लोकसंख्या सामावून घेऊ शकतो. आज माप परमिशन दिली आहेत बिल्डींग बांधायला. कसलाही शहराच्या विकासाचा क्रीटीकल डेव्हलपमेंट होत आहे मल्टी स्टोरीट बिल्डींग होत आहेत, हा जो 2021 चा सेंसल झाला असता तर ह्या शहराची लोकसंख्या 15 लाखाच्या पुढे गेली असती आणि हे विकास कर वाढवून आपण ह्या शहराला कुठे घेऊन जाणार आहोत. तेवढा इन्फ्रास्ट्रक्चर आपण देऊ शकणार आहोत का? फक्त सिमेंटच्याच बिल्डींग बनवून ह्या शहराची लोकसंख्या सामावून घेण्याचे ऑलरेडी क्रॉस फक्त इनकम मिळत आहे म्हणून विकास कर याच्या माध्यमातून इनकम घ्यायचा आणि वारंवार लोकसंख्या वाढवायची तुलसीदास म्हात्रे साहेब महापौर असते वेळी आयुक्त साहे आम्ही म्हाडाला आणि एम.एम.आर.डी.ए ला रिक्वेस्ट केली होती की हे शहर जास्त लोकसंख्या स्विकारु शकत नाही त्यामुळे तुमचे 4 एफ.एस.आय 2.5 एफ.एस.आय च्या ज्या स्कीम आहेत त्या ह्या शहरामध्ये लादू नका. इतर शहरामध्ये जा आम्ही रिक्वेस्ट केली होती. आज मोठे मोठे कॉम्पलेक्स 4 एफ.एस.आय.

2.5 एफ.एस.आय आता नविन डी.पी.आर प्रमाणे एक्स्ट्रा एफ.एस.आय असं झालेलं आहे. त्याच्यावर सुध्दा विचार करण्याची गरज आहे. एवढा लोढ महापालिका सहन करु शकते का?

मा. महापौर :-

ह्या विषयाचे उत्तर आयुक्त महोदय देत आहेत.

अनिल सावंत :-

परवाना विभाग आपल्याला सुध्दा ह्या शहरामध्ये महापालिकेमध्ये एक वेगळीच पध्दत चालू झाली आहे की ठेका द्यायचा, आज ह्याठिकाणी ठेकेदाराला एक परवाना काढायचा असेल तर 40 टक्के कमीशन देतो म्हणजे 500 रुपये जर परवानाची फी असेल तर 200 रुपये आपण त्या ठेकेदाराला देतो. अगोदर हेच काम महानगरपालिका करत होती. ह्या ठेकेदाराला दिल्यापासून महापालिकेच्या उत्पन्नामध्ये फरक पडलेला नाही. उलट ते 40 टक्के कमिशन त्या ठेकेदाराला जाते आहे आणि इनकम तेवढेच राहिले आहे. स्टाफ सुध्दा परवाना विभागाचा तेवढाच आहे. उद्यान देखभालीसाठी आपण दोन वर्षाचा 26 करोडचा ठेका दिलेला आहे. हे उद्यान शहरातील जी.आर जीचं त्यामध्ये कट केली इतर जी उद्याने आहेत त्यांना देखभालीचा म्हणजे वर्षाला 13 करोडचा खर्च आणि बजेट प्रोव्हीजन फक्त दोन करोड आहे. एक तत्वावर ठेका दिलेला आहे. तो चुकीचा आहे किंवा प्रोव्हीजन चुकीची आहे हे माझे मुद्दे आहेत. प्रशासनाने याचा गांभीर्याने विचार करावा.

चंद्रकांत वैती :-

आज होणाऱ्या सभेमध्ये आदरणीय महापौरांच्या परवानगीने बोलतो मॅडम, साधारणपणे आयुक्त साहेब असे संकेत असतात की ज्याचा जेवढा वजन आहे त्याच्या दुप्पटीने तो वजन उचलू शकतो. त्यात विशेष प्राविण्य संपादन केलेला किंवा विशेष शरीरयष्टी कमवलेला माणूस अधिकच वजन उचलू शकतो. आपल्याकडे बजेट आल्यानंतर आयुक्तांचे अंदाज आणि स्थायी समितीमध्ये सातत्याने तीन दिवस चर्चा करुन स्थायी समितीच्या सदस्यांनी काही वाढ सुचवलेले आहेत. काही अधिकाऱ्यांनी त्याच्यामध्ये सुचना केल्या असतील की आपल्याला एवढे अपेक्षित होत. त्याच्यापेक्षा आपल्याला एवढे आले आहेत. अशा पध्दतीने आपण असलेला बजेट अत्यंत मोठ केलेलं आहे. कदाचित आयुक्त साहेबांना ह्या गोष्टी पटल्या नसतील. मग अशा विवक्षित परिस्थितीमध्ये आयुक्त साहेब आपले आकडेवारी आणि महासभेने घेतलेली आकडेवारी शासनाकडे सादर करतील आणि येताना ते बजेट आयुक्तांनी दिलेले आकडेवारीतच पास होऊन येईल असे 1500 कोटीची आपण डायरेक्ट 2200 कोटी रुपयाचे बजेट प्रस्तावित करतो मग हे बजेट वाढवण्यासाठी आपले मोठा मोठा का आपण म्हणतो. आपले उत्पन्नाचे स्त्रोत कुठली तर आपला हाऊस टॅक्स आहे, पाणीपट्टी आहे, विविध दाखले, विविध लायसन्स याच्यावरती उत्पन्न आहेत मग विकसित होणारे इमारती आहेत म्हणजे मिरा भाईंदर महापालिका महाराष्ट्रामध्ये असलेल्या 35 बी क्लास महानगरपालिकांपैकी सर्वाधिक सेवांवरती कर लावलेली महानगरपालिका कदाचित महाराष्ट्रातील आपली असेल. सगळ्या गोष्टीवर आपण कर लावले आहेत. आणि अजून आपण कर प्रस्तावित करणार आहोत. साधारणपणे 1491 चा स्टाफ असलेली महापालिकेत आता त्याच्याही पेक्षा खाली आली असेल कारण बरेचसे रिटायर्ड झालेत मग अशा महापालिकेतल्या आपण अनेक सेवा ज्या आहेत त्या आऊट सोर्सेसने निभावतोय मग त्याच्यामध्ये कचरा, आरोग्य आता असलेले विशालकाय सिक्युरीटी ही पण आपल्याला डोईजड आहेत ह्या गोष्टी आपण फार मोठ्या प्रमाणात ह्या महापालिकेचा खर्च करत असतो अनिल सावंत साहेबांनी सांगितलं की 78.40 स्क्वेअर कि.मी मध्ये असलेली ही महानगरपालिका वर्टीकली विकसित होत आहे. कारण होरीजन्टली विकास करायला संधी नाही एका बाजूला संजय गांधी राष्ट्रीय उद्यान दुसऱ्या तिन्ही बाजूने खाडीने वेढलेला हे शहर आहे. म्हणजे बराचसा भाग आपला एका इकोसेंसेटिव्ह झोनने ग्रासित होणारा आहे. तर ह्या शहरामध्ये आपण किती ही प्रकारचे खर्च लावणार आहोत. सगळ्या गोष्टीमध्ये ठेका पध्दती आहे. मग ह्या ठेका पध्दतीने आपण ज्यांना त्या ठेक्यावर नेमले आहे एक

उदाहरण की वन विभागामध्ये आपण मोठ्या संख्येने ठेका पध्दतीने माणसं घेततलेली आहेत तग ते खरच काम करत आहेत का? ह्या विषयात असं सांगायचे मला की आपण मग ठेका पध्दतीने आऊट सोर्सिंगने ज्यांना ज्यांना जी जबाबदारी दिलेली आहे ती पूर्ण कार्यक्षमतेने ते पूर्ण करता की नाही याच्यासाठी देखील आपण एक अधिकारी नेमला पाहिजे. मोठ्या संख्येने आपण अधिकारी ह्या महापालिकेत घेतलेले आहेत. आयुक्त साहेब तर ह्या सर्वांचे सर्व्हेक्षण होत राहिले पाहिजे. आपण आयुक्तांच्या निवेदनामध्ये असे ही पाहिले आहे की आपण 13 रुपये 90 पैसे लिटरने पाणी आज प्रती हजार लिटरने लोकांना देतो. त्यात ही आपल्याला तूट येत आहे. कदाचित आपल्याला त्यासाठी भविष्यात पाणी बिलात वाढ करावी लागेल अर्थात येणारे सूर्या डॅकचे योजनेतून आपल्या शहरातला बराचसा भाग पाण्याच्या बाबतीत आपण जवळपास काठावरती आहोत त्याच्यामध्ये शहरातल्या लोकांच्या गरजा निभावू शकतात परंतू येणारी जी लोकसंख्या सातत्याने वाढणारे हे शहर आहे. त्याच्यामुळे सतत पाणी कमी राहिलं एक मुद्दा अनिल सावंत त्याच्या भाषणात आला की त्यांनी सांगितलं मल:प्रवाह कर ह्या शहरामध्ये एकूण 19 गाव आहेत त्या एकाही गावामध्ये आपली अंडर ग्राऊंड ड्रेनीज सिस्टीमची योना पोहचलेली नाही पण त्याठिकाणी आपण सर्वांकडून मल:प्रवाह कर आपण घेतो. मग खुलासा असा दिला जातो की तिथे गटारं आहेत किंवा सेप्टीक टँक आहेत ते साफ करतो. मग त्या सेप्टीक टँक साफ करण्यासाठी तितपर्यंत गाड्या पोहचत नाही परंतु ज्या पोहचतात त्यांच्याकडून ते सेप्टीक टँकची फीज घेतली जाते. तरी हा मल:प्रवाह कराबद्दल देखील आपण ह्या विषयावर चर्चा केली पाहिजे आणि साहेब आपण विविध प्रकारच्या परवानग्या देतो तर काही परवानग्या आपण सध्या थांबवल्या आहेत त्या विशेष करुन ह्या परवानग्या चालू कराव्या आणि त्याच्यामधून देखील आपण एक उत्पन्न जनरेट करु शकतो आपण जर 5 हजार किंवा 10 हजार रुपये शुल्काला आणि स्ट्रक्चरल ऑडिटरकडून ऑडिट करुन घेतलं आणि जी गावात अस्तित्वात असलेली किंवा ज्यांच्याकडे पुरावे आहेत अशाच घरांना परवानग्या द्याव्यात ह्या परवानग्याचा गैरवापर करुन नसलेल्या जागेवरती परवानग्या दाखवल्यामुळे आपण त्या बंद केलेल्या आहेत. तर उत्पन्नाच्या स्त्रोतामध्ये भर करण्यासाठी आपण त्याचा वापर करु शकतो. एक विशेष तत्वाने महापौर मॅडम मी आपल्याला पत्र दिल होतं आणि त्या पत्राने आयुक्त साहेबांना पत्र दिलं आहे की आपण बजेट प्रोव्हीजन करताना ह्या शहराला असलेला प्रचंड मोठा असा ऐतिहासिक वारसा आहे त्याची नोंद सगळीकडे आहे त्यातला एक वारसा ह्या बजेटमध्ये सुटला आहे असे मला वाटते. ज्यावेळेला आयुक्त डॉ. विजय राठोड साहेब होते तेव्हा मी एक पत्र दिलं होतं की घोडबंदरला एक वास्तु आहे. जो पोर्तुगीजांचा काळांचा किल्ला आहे तो किल्ला महापालिकेने महाराष्ट राज्य स्वरक्षीत स्मारक योजने अंतर्गत दत्तक घेतला असून त्याचा संवर्धन संगोपन आणि दुरुस्ती अत्यंत नेटक्या पध्दतीने ही महानगरपालिका करत आहे. कदाचित महाराष्ट्रात एखाद्या महानगरपालिकेने केलेले सर्वत्त काम कुठचा असेल तर हा घोडबंदरचा किल्ला असेल, अतिशय चांगला काम आहे आणि सर्व सदस्यांना सांगु इच्छितो की जी पहिली शिवजयंती तिथे साजरी केली होती तेव्हा महापालिकेतल्या प्रत्येक नगरसेवकाच नाव प्रत्येक पक्षाच्या नगरसेवकाचं नावाचे फलक देखील मी तिथे लावले होते. सर्वाथाने सगळ्यांनी केलेला एक प्रयत्न होता आणि ती वास्तु अत्यंत नावारुपाला येत चाललेली आहे. त्या किल्याला फार मोठा इतिहास आहे, ह्या शहराचे हा परिसर बिंब राजाच्या अधिपत्याखाली होता त्यानंतर बहादुर सुलतान शाह यांच्या अधिपत्याखाली होती आणि त्यावेळेला तिथे एक वास्तु बांधली गेली ही वास्तु ह्या बजेटमधून सुटली आहे. मार्टीन अल्फान्सोने हा असलेला किल्ला पोर्तुगीज चर्च म्हणून 17 व्या शतकात होतं त्यानंतर एका फकीराने त्याला मशीदीत रुपांतर करण्याचा प्रयत्न केला मग पोर्तुगीजाचे कलेक्टर ऑफीस त्याच्यातून चालू झालं की वास्तू एम.पी.डी.सी. चे गेस्ट हाऊस होणार आहे. ती रक्कम राठोड साहेबांना मी पत्र दिलेलं एम.पी.डी.सी. कळवलं त्यांच्याकडून 207 करोड रुपयात आपल्याला ती इमारत एम.पी.डी.सी. आपल्या ताब्यात देणार आहे ह्या शहरातला समृध्द

इतिहास सांगण्यासाठी आपल्याला त्या जागेमध्ये एक चांगल्या प्रकारचं वास्तु बनवता येईल तर त्याच्यामध्ये 260 करोड रुपये अपेक्षित जी त्यांची किंमत आहे ती आणि त्यांच्या दुरुस्तीसाठी म्हणजे असे साधारणपणे 5 ते 7 करोड रुपयाचा प्रोव्हिजन त्या वास्तुसाठी भरावं. एम.पी.डी.सी. गेस्ट हाऊस करावं अशी विनंती आपल्याला आहे. त्या बजेटमध्ये अजून प्रोव्हीजन करता येईल मी तुम्हाला आधी पत्र दिलेलं आहे आयुक्तांन पण पत्र दिलेलं आहे.

मा. महापौर :-

ठीक आहे सभापती महोदय ह्याबद्दल जे आता वैती साहेबांनी मांडलेला आहे त्याबद्दल विचार करावा.

चंद्रकांत वैती :-

आपण किल्ल्यासाठी अतिरिक्त प्रोव्हीजन करावी.

जयेश भोईर :-

विषय आहे मल:निस्सारणचा बजेटमध्ये तरतूद करण्यासाठी गावामध्ये मल:निसारण आले तिथे गाड्या पोहचत नाहीत. जिथे गाड्या जातात त्याचे आपण पैसे भरतो पण तरी आमच्या गावकऱ्याकडून तो मल:प्रवाहाचा टॅक्स आकारला जातो. लोक भरतात पण सुविधा दिली जात नाही. तर ती बजेटमध्ये काही तरी तरतूद करुन छोट्या गाड्या जे गावामध्ये घुसल्या पाहिजे ती बजेटमध्ये तरतूद करावी.

मा. महापौर :-

नक्की.

निला सोंस :-

धन्यवाद महापौर महोदय, मेरा रिक्वेस्ट है की बजेट में एम.बी.सी. अंदाजपत्रक मतलब इट इज द प्रोजेक्शन बेस्ट ऑन द अजेमशन दॅट वन शुअर की हम इंटेनशनली अच्छा काम करके उनको उतनाही इम्पलीमेंट कर पायेंगे इतना हम प्रोजेक्ट कर रहे है| इसमें पेज नंबर 24 में रिक्वेस्ट करुंगी यहाँ पे सिरियल नं. 21 है आरक्षण क्र. 302 हॉस्पीटल विकसित करणेबाबत शासन अनुदान जो आयुक्त महोदयने बजेट पेश किया स्थायी समिती को उसमें उन्होंने शासन अनुदान 100 कोटी मतलब प्रोजेक्शन में दिया हुआ है| जब की स्थायी समिती में उसे नही लिखा है और इस पुरे बजेट में मुझे लगता हम सभी लोग अॅग्री करेंगे की हमसे कही ना कही कोविड काल को जो हमने दिखा है की आरोग्य कितना इम्पॉटन्ट है और मिरा भाईंदर की वस्तुस्थिती अगर हम देखे तो जो शासन का नियम है की 50 हजार की उपर एक आरोग्य केंद्र भी होना चाहिए और हमारी 8 लाख की आबादी जो की प्रोजेक्टेड आबादी नही है| अॅक्च्युअल आबादी नही है| उसके हिसाब से भी हमारे पास आरोग्य केंद्र नही है तो स्थायी समितीने आयुक्त महोदय के इस बजेट में से पुरी तरीके से निकाल दिया मैं उसका रिझन जानना चाहूँगी और आपको निवेदन भी करना चाहूँगी की आराग्य को अभी कोविड काल के बाद लो बिलकुल नजर अंदाज नही कर सकते है| तो आरोग्य केंद्र हो यहा आरक्षण क्र. 300 जो आयुक्त महोदय ने कहाँ विकसित करने के लिए शासन से अनुदान लाने की जिम्मेदारी खुद शासन के व्यक्ती ले रहे है तो उसको प्रोत्साहित करना चाहिए| उनको तो समर्थन करना चाहिए|

मा. महापौर :-

ठीक है आपने जो कहाँ उसको किया जाएगा|

निला सोंस :-

महापौर महोदय दॅट टू पॉईंट्स इन द बजेट सो लेट मी कम्पलीट आय अॅम शुअर और भी लोगो ने बहुत वक्त किया है आय विल टॉक ओनली ऑन पॉईंट्स. सेंकड पॉईंट नं. 26 दॅट इज वन्स अगेन बिहाइंड टॉकींग अबाऊट द शासन अनुदान मतलब यह विरोधाभास देखीए 21 नंबर के पॉईंट में जहाँ आयुक्त जिम्मेदारी ले रहे है शासन अनुदान की प्रोजेक्शन दे रहे है वही पॉईंट नं 26 में हम

प्रॉपर्टी टॅक्स करने के लिए आयुक्तजी ने कोई अपना अमाऊंट नही लिखा है| लेकिन स्थायी समितीने 110 करोड का अमाऊंट लिखा है| मैं एक बात कहना चाहूँगी की बजेट अगर पेपर की सुर्खीया पढना है की हमने कितना करोड का बजेट किया है और पेपर की सुर्खीया जनता को दिखानी है तो जनता आज की तारीक में सिर्फ काम देखती है, प्रचार देखती है, भ्रष्ट्राचार देखती है, पेपर की सुर्खिया हमे ॲक्च्युव्हल रिझल्ट नही दे सकती है| तो जब हम स्थायी समितीने अगर यह लिखा है 110 का अंदाजपत्रक की हा भैया वो प्रशासन की जिम्मेदारी ले रहे है की राज्यसरकार से को महानगरपालिका के लिए 500 स्क्वेअर फीट के लिए टॅक्स वेब्स करने के लिए क्या स्थायी समिती के सभापती ने यह जिम्मेदारी ले रहे है|

मा. महापौर :-

ठीक आहे. आपले पॉईंट आपण याच्यामध्ये नमूद घेण्यात येतील. नक्की विचार करणार.

निला सोंस :-

महापौर महोदय मेरा आपसे निवेदन है की हम सब जनप्रतिनिधी जानते है की जनता का इस सिस्टम से भरोसा बैठे हमे किसीको झुटी उम्मीद देना भी धोखा होता है| सर मैं यहाँ पर प्रशासन सिस्टम बैठे हुए है| आयुक्त महोदय उनसे जानना चाहूँगी पेज नं. 22 में हमने जो प्रोजेक्शन लिखा है की हमारे पास पैसा कहाँ से आएगा, इन्ट्रेस के रुप में पॅनल्टी के रुप में, वसुली के रुम में जहाँ तक मैं जानती हूँ पूरा सभागृह भी जानता होगा की करोडो रुपये ओपन लँड टॅक्स के रुप में हो| 80 करोड चाहे होर्डिंग्ज के रुप में हो 40 करोड इन सब का प्रोजेक्शन में क्यों नही किया गया आर यू नॉट वर्कींग टू दॅट क्या हम उस वसुली के लिए नही काम कर रहे है| व्हाय इज नॉट इन द प्रोजेक्शन आज हम मोबाईल टॉवर्स का ही देखंगे तो करोडो में बाकी है| तो मतलब हमारे पास जो करोडो की आऊट स्टॅन्डिंग है वो किसी भी हेड में नही है| जब महापौर महोदय वो किसी हेड में ही नही होगी तो उसके उपर काम कौन कर रहा है| क्या उसमें हम काम कर रहे है और अगर हम काम कर रहे है तो वो रेव्हेन्यू आएगा तो वो किधर खर्चा में जाएगा व्हाय धिस नॉट प्रोजेक्शन.

मा. महापौर :-

आपली सुचना नक्कीच विचारत घेतली जाईल.

निला सोंस :-

महापौर मॅडम यह गंभीर विषय है|

मा. महापौर :-

सन्मा. सभापती महोदय आपल्याला सर्व प्रश्नांची उत्तर देतील.

निला सोंस :-

महापौर महोदय यहाँ तो आप आन्सर दिजीए| यहाँ तो ॲम्बीटेशन आन्सर दे|

मा. महापौर :-

तुम्हाला उत्तर मिळणार.

निला सोंस :-

कधी?

प्रभात पाटील :-

बजेटच्या मिटींगमध्ये मला बोलायला दिल्याबद्दल धन्यवाद. खरतर पैसा येणार आहे आणि ह्या शहराच्या विकासासाठी तो मार्गी लागणार आहे. पण येणाऱ्या सगळ्या पैशाचा उल्लेख नमूद करावासा वाटतो की माझ्याकडे नोव्हेंबर महिन्यातले आकडे आहेत. मोबाईल टॉवरच्या 57 कोटीची आपल्याकडे थकबाकी आहे. त्याच्यानंतर मोकळ्या जागेचा आपल्याकडे 67 कोटीची आपल्याकडे थकबाकी आहे. जाहिरात मनोऱ्यांवरची आपल्याकडे 41 कोटीची थकबाकी आहे याचा मेंशन मला वाटतो फक्त एकच जाहिरात मनोऱ्यांच मेंशन आपल्याकडे आहे. बाकी दोन्ही मोकळ्या जागेवरचा कर

आणि जाहिरात कर ह्याचा कुठेही उल्लेख बजेटमध्ये झालेला नाही. ह्याचा उल्लेख आपल्याकडे मेंशन झाले पाहिजे होते. त्याच्यामुळे आपल्या बजेटवर फारसा परिणाम होणार आहे. तुम्ही जे हेड दिले आहेत ह्याच्यात परवाना ह्या हेडवर मला बोलायचं आहे आणि ते एवढ्यासाठी बोलायचं आहे की शहरात इतक्या आस्थापना आहे त्या आस्थापना दिवसा गणीक वाढत आहेत. पण त्यांच्यावर योग्य तुम्ही मोजमाप केलं तर तुमच्या बजेटला पुरक अशी तिथे उत्पन्नाचं स्त्रोत होऊ शकतो. बऱ्याचदा आपण काय करतो की ठेका देऊन टाकतो आणि आज काल तर मला असे वाटते की ह्या पालिका मुख्यालयातल्या कर्मचारी सोडले तर अखी पालिका हे ठेक्यावरच चाललेली आहे. मला असे वाटते असे नाही सगळ्यांचे तेच मत असेल त्याच्यानंतर ह्या शहरामध्ये म्हणजे इंदलोकचा परिसर जर पकडला आपण गोल्डन नेस्टपासून पूढे तर शहरामध्ये इतके अनधिकृत गॅरेजेस आहेत की माणसाला चालायला कमी आणि गाड्या जास्त त्यांच्या पार्कींगला जागा जास्त त्यांच्यावर जरी आपण कर लावलं मी म्हणत नाही त्यांना हकला. शहरातली लोक असतील त्यांना उद्योगधंदा मिळाला पाहिजे. त्यांचे सगळ चाललं पाहिजे. पण त्यांना किती कर लावल्यानंतर आपल्याला किती फायदा होऊ शकतो. आपण चालत नाही परंतु त्यांना मात्र गाडी पार्किंगला जागा आहे. शिवाय इंद्रलोकचा सगळा परिसर अगदी तुम्ही काशिमिरा नाक्यापर्यंत घेतला तर रस्त्यावरती एवढा पार्किंग आहे, तर त्या पार्किंगचा आपण काय करतो. आपण आपली एक बाईक आणि आपण दुकानामध्ये गेलो तर आपली बाईक टोईंग घेऊन जाते.

मा. महापौर :-

त्यासाठी बजेटमध्ये आपल्याला काय करावे लागेल ते बोला.

प्रभात पाटील :-

मी तेच बोलते, हे मी नाही करणार. तुम्ही नाही करणार प्रशासनाने करायच्या गोष्टी आहेत. त्यांना कर लावा, त्यांना टॅक्स लावा, त्यांना भाड लावा, त्यांना काही ही करा पण तुम्ही उत्पन्नाचे स्त्रोत वाढवा ना. उत्पन्नाचे स्त्रोत ह्या पध्दतीने पण वाढवले जातात. नगरोत्थानच्या मुद्द्यावर 2-3 सदस्य बोलले पण मी ह्या मुद्द्यावर बोलणारच आहे. 2007 मध्ये भुमीगत गटारांना सुरुवात केली. इंद्रलोकमध्ये सर्वात मोठी वसाहत झाली. त्याच्या जोडण्या कुठे आहेत आपण मलप्रवाह घेतो तो वेगळा भाग आहे. ज्याच्याकडे नाही ते लोक सुध्दा भरतात पण तुम्ही ते करा. येणाऱ्या चार दिवसामध्ये इंद्रलोकमध्ये खोदून ठेवतील आणि आपल्याला सांगतील तिथे लाईन टाकायची होती ना. 2007 ते 2022 किती वर्ष झाली. आपण त्याच्यासाठी कर्ज घेतले आहे. त्या कर्जावर आपण व्याज भरतो. कर्ज अजून पूर्ण झाले नाही. ए.जी. वस्तू 2007 ला 100 रुपयेला मिळत होती आज त्याची किंमत 300 रुपये झाली आहे. काम कम्पलीट करा ना. नवघर रोड बी.पी. रोडला तुम्ही भुमीगत गटार करु शकत नाही. आज आपण कारण देतो की तिथे दाट लोकवस्तीची घर आहेत. पण भविष्यामध्ये काहीतरी करायला लागेल त्याची तरतूद करा. त्याच्या भरपूर टेक्नॉलॉजी आहेत. माझ्यापेक्षा तुम्हाला जास्त माहित आहे. महिला बालकल्याणमध्ये आपण बरेच वेगवेगळे उपक्रम आणले आहेत त्याचे स्वागत आहे. गेल्या वेळेला आपण निराधर महिलांसाठी माय माऊली योजना आणली एक सर्टन अमाऊंट देण्याचे प्रोव्हीजन केले. किती लोकांना मिळाले फॉर्म किती आले त्याच्याकडे आपले लक्ष नाही. गेल्यावर्षी 4000 हून जास्त फॉर्म आले कोणाला मिळाले. त्याचा काहीतरी नियोजनबध्द कार्यक्रम व्हायला पाहिजे होते मला असे समजले कोणाचे 100 च्या 100 फॉर्म निकाली निघाले कोण म्हणते माझे 40 झाले कोण म्हणते 20 झाले. माझा एकही झाला नाही का? त्याचे कारण शोधले पाहिजे ना. नियोजन व्हायला पाहिजे. एवढे सगळे करुन त्या लोकांना काय उत्तर देणार कोण म्हणते त्याच्यातले 3-3 फॉर्म सर्वांना दिले. माझ्याकडे एकही आला नाही. ते हो मी सांगते. मी 20 फॉर्म भरले त्याच्यातले 3 फॉर्म घेणार तर 17 लोकांना काय उत्तर द्यायची. मी देणार की प्रशासन देणार प्रशासन तिथपर्यंत पोहोचत नाही.

मा. महापौर :-

सदस्यांना विनंती आहे बजेटची मिटींग आहे. आपल्या सदस्यांच्या भावना बघून आपण सर्वांना संधी दिली आहे.

प्रभात पाटील :-

एवढे फॉर्म आले आहेत त्यांना काहीतरी उत्तर द्यायला लागेल. गेल्यावर्षी तरतूद होती तेवढीच तरतूद ठेवली आहे मग पूढच्या वर्षाच्या योजनेचे काय?

मा. महापौर :-

सभापती महोदय तुम्हाला उत्तर देतील.

प्रभात पाटील :-

दिव्यांगासाठी आपण तरतूद केली आहे त्यांना आपण कानाचे मशिन, डोळ्यांचे चश्मे देतो सगळे देतो. ऐकायला येत नाही म्हणून मी एक माणूस पाठवला त्यांनी किती हेलपाटे घालावे. ह्या गोष्टी त्यांना वेळेवर मिळाल्या पाहिजेत. आपण चांगल्या सोयी सुविधा राबवतो. मुलांसाठी आपण फी माफी केली. आज अशी लोक आहेत. परिक्षा संपायला आल्या त्या मुलांना शाळेतून घरी पाठवतात की फी भरली नाही. त्यांनी आपल्याकडे फॉर्म भरला आहे की मला पालिकेतून पैसे येतील आणी मी फी भरेल. शाळांनी परिक्षा घेत नाही त्यांच्या परिक्षा पेंडींग ठेवल्या आहेत. त्यांना आपण आशा लावली त्यांची आशा पूर्ण करणे आपले काम आहे अशा काही गोष्टी आहेत ज्याच्यावर बारकाईने काम करणे गरजेचे आहे.

नयना म्हात्रे :-

मा. महापौरांच्या परवानगीने महिला बालकल्याणमध्ये गेली सभापती होती त्यांनी आम्हाला फोन करुन सांगितले फॉर्म भरा. कोणी 100 भरले कोणी 50 भरले, कोणी 30 फॉर्म भरले. बऱ्याच सदस्यांनी फॉर्म भरलेले तेव्हा 3-3 महिलांना पैसे पण गेले. आमच्या वॉर्डात एकाला पण पैसे आले.

हसमुख गेहलोत :-

मा. महापौरांनी सांगितले आहे बजेटवर बोला हा विषय प्रभात ताई बोलल्या आहेत ह्याच्यावर गंभीर दखल घेणार आहेत. तुमची योग्य ती सुचना घेणार आहोत.

रुबीना शेख :-

मॅडम महिला बालकल्याण हमारे शहर का महत्त्वपूर्ण डिपार्टमेंट है| मैं इस बार भी सदस्य थी और पिछली बार भी सदस्य थी, पिछली साल हमारे टीमने अच्छी स्किम लायी और अच्छे काम किए जिसमें माय माऊली और मेल कॅन्सर पेशंट के लिए बहुत अनोखी सोच थी की लोगो की मदत की जाए| बहुत अनोखी सोच थी की लोगो की मदत की जाए| बहुत अफसोस की बात होती है की इस महासभा में और डिपार्टमेंट द्वारा हम लाखो करोडो की लोगो के लिए प्रोव्हिजन करते है डिपार्टमेंट के जरीए बहुत सारी स्किम बनाते है| महिला बालकल्याण की बात करु तो बहुत ऐसी स्किम है जो महिला और बाल के प्रोग्रेस के लिए हमारे शहर ने बनाई है| मेरा एक सुझाव है जब हम यह स्किम बनाते है और उनको लागू करते है तो हमारा फर्ज बनता है की वो जो सुविधा हमने शहर को देने का वादा किया है हम जब यह जिम्मेदारी लेके लोगो के बिच जाते है उन्हें हमें जवाब देना पडता है आप महिला होने के नाते समझ सकती है| जब हमें हमारे उपर लोगो से जवाब नही मिलता तो हमारे पास कोई आन्सर नही रहता| हम जब लाखो करोडो की स्किम बनाते है क्या वो पुरी तरह लागू हो रही है वो देखना हमारी जिम्मेदारी और फर्ज है| माय माऊली स्किम और कॅन्सर पेशंट के लिए मैंने आपको रिटर्न में लेटर दिया है| कमिशनर साहब को लेटर दिया है, पानपट्टे साहब को लेटर दिया है| उन्होंने संखे साहब को बुलाके कहाँ की मुझे रिटर्न में जवाब दिया जाए क्योंकी जिस तरीके से वो जवाब दे रहे थे उससे सॅटीसफॅक्शन नही था|

मा. महापौर :-

आपण केलेली सुचना विचारात घेतली जाईल.

वंदना पाटील :-

सन्मा. सदस्या बोलल्या की मी त्यांना फोन करुन फॉर्म भरायला सांगितले मी कोणाच्या घरी गेले नाही आणि मी कोणाला फॉर्म वाटले नाहीत. फॉर्म प्रशासनानी वाटले आहेत आणि मी त्यांना फॉर्म भरायला सांगितले नाही. त्यांनी आणून माझ्याकडे दिले मी कोणाच्या दरवाजावर गेले नाही. आपल्याकडे 15 लाखाची तरतूद होती. नगरसेवकांचे 3-3 च फॉर्म निघणार होते. पण आम्ही उपमहापौरांच्या केबीनमध्ये कुलकर्णी साहेबांना बोलवले तेव्हा कुलकर्णी साहेबांना बोलवले तेव्हा कुलकर्णी साहेब बोलले तुमची नगरसेवक निधी म्हणून चालले त्यामुळे आम्ही ते फॉर्म घेतले आणि त्यांना पोहोच पण दिली नाही. कारण त्या फॉर्मचे काय होईल मला ही माहित नव्हते कारण आपल्याकडे 15 लाखाची तरतूद होती तीन फॉर्म निघणार हे नक्की होते. नगरसेवक निधी म्हणून चालले माझी 5 लाखाची नगरसेवक निधी बऱ्याच नगरसेवकांचा निधी त्या कामासाठी दिली होती. पण आज परत ती निधी उद्या परवा लॅब्स होईल. आम्हाला अजून एकही लेटर आले नाही की तुमची नगरसेवक निधी त्याच कामासाठी वापरली गेली की वापरली गेली नाही ते आजही कळले नाही. त्याची जिम्मेदारी कोण घेणार. महिला बालकल्याणनी एवढी चांगली काम केली मी आयुक्त साहेबांचे आभार मानते की त्यांनी आम्हाला महिला बालकल्याण समितीसाठी खूप खूप मदत केली.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य आपले म्हणणे विचारात घेतले जाईल. आज बजेटची मिटींग आहे. सभागृह नेते ठराव वाचा. महिला बालकल्याण मिटींग घेतली जाईल आणि ह्यावर मार्ग काढला जाईल. आपण केलेली सुचना विचारात घेतली जाईल.

(सभागृहात गोंधळ)

वंदना पाटील :-

मा. महापौर मॅडम, 25 लाखाची प्रोव्हिजन केली आहे ती मेमोग्रॉफीची मशिन इंदिरा गांधी हॉस्पीटलमध्ये आलेली आहे. टी.बी. पेशंट बघण्यासाठी एन.यू.एच.एम.च्या ज्या सिस्टर्स जातात त्यांना तुम्ही स्कूटर घेऊन द्यावी.

मा. महापौर :-

तुमचे म्हणणे ऐकून घेतले आहे. तुम्ही खाली बसा.

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

सर्व सदस्यांना विनंती आहे की सर्वांनी एकत्र बोलू नये.

मदन सिंग :-

मा. महापौरांच्या परवानगीने आपले जेसल पार्क घोडबंदर प्रस्तापित रस्ता त्याचे काम चालू आहे की बंद आहे. ते कधी पर्यंत होणार आहे.

मा. महापौर :-

आपण प्रश्न उत्तर का विचारताय. चर्चा करायला ही सभा नाही ही बजेटची सभा आहे. तुम्ही जुने नगरसेवक आहेत. आकडेवारीमध्ये काय बदल करायचा असेल तर ती सुचना करा.

मदन सिंग :-

त्या रस्त्याला जो मंजूर फंड होता तो कॅन्सल करण्यात आलेला आहे. आपला भाईंदर पूर्वेला नवघर रोड आणि बी.पी. रोडची जी क्षमता आहे ती संपत आलेली आहे. आयुक्त साहेब मी आपल्याला भेटलो. बारकुंड साहेब आणि खांबित साहेबांच्या 3-4 वर्षापासून मागे लागलेलो आहे. आपला जो

प्रस्तावित जेसल पार्क घोडबंदर रोड आणि नवघर रोड त्याच्या मध्ये एक प्रस्तावित डी.पी. रोड आहे. त्या रोडसाठी आर्थिक तरतूद ह्या बजेटमध्ये करावी ही माझी विनंती आहे. तो रस्ता गरजेचा आहे.

मा. महापौर :-

तुमची विनंती नक्की विचारात घेऊ.

गिता जैन :-

सगळ्यांना बोलू द्या.

मा. महापौर :-

बजेटच्या विषयावर बोला. तुम्ही कुठल्याही विषयावर बोलता.

अनिल भोसले :-

मा. महापौर मॅडम, ह्या शहरामध्ये अनेक विषयामध्ये अनेक वर्षापासून बजेट निर्माण होतात. आमच्या प्रभागाचा परिसर हा आदिवासी परिसर आहे. ते नागरी सुविधापासून वंचित आहेत. उदाहरण केसरीपाडा, बेलकरीपाडा, पाटीलपाडा अनेक पाडे आहेत. अनेक पाड्यामध्ये डी.पी. रोड प्लानमध्ये आहेत. लोकसंख्या कमी असल्यामुळे महापालिकेनी आतापर्यंत रस्ते विकसीत केले नाहीत किंवा बजेटमुळे होत नाही. आपण दर पाच वर्षानी प्लानिंग करतो परंतु हे रस्ते अजून विकसित झाले नाहीत. उदा. नवि मुंबई, ठाणे ह्या परिसरामध्ये पाड्या पाड्यामध्ये गाव होती. त्यामध्ये जे पाय रस्ते येतात. 9 मीटरच्या रस्त्यामध्ये महापालिकेनी त्या गावात जाणारे जुने रस्ते त्यामध्ये येणारे सातबारा धारक त्यांच्या ह्या पायी रस्त्यामध्ये जमिनि येतात त्यांनी बजेटमध्ये तरतूद केली परंतु थोडे फार लोक आहेत आणि कमी पैशामध्ये डी.पी. रोड जर होत नसतील तर हे रस्ते पायी रस्ते अनेक पिढ्यापासून आहेत त्या सातबारा धारकांना मोबदला देण्यासाठी तरतूद करावी अशी माझी विनंती आहे.

मा. महापौर :-

तुमची विनंती लक्षात घेतली जाईल.

अनिल सावंत :-

मा. महापौर मॅडम, 10 वर्षापासून बी.एस.यू.पी. मध्ये अनेक लोक घरापासून वंचित झाले आहेत आपण महापौर असताना कर्जासाठी ठराव मंजूर झाला आहे. तो आपण शासनाला पाठवला आहे. पण त्या ठिकाणी एम.एम.आर.डी.ए. नी एक अट निर्माण केली आहे जोपर्यंत महापालिकेचा ठेकेदराचे बिल देत नाही तोपर्यंत ते अनुदान मिळणार नाही.

मा. महापौर :-

सन्मा. अनिल भोसलेजी आपल्या माहितीसाठी सांगते. ह्या बजेटमध्ये बी.एस.यू.पी. साठी 50 कोटीची तरतूद केलेली आहे. दलित वस्तीमध्ये आदिवासीसाठी निधी प्राप्त झालेला आहे. तसेच आदिवासी क्षेत्रामधील नागरिकांच्या सुखसुविधेसाठी 50 लाखाची तरतूद महापालिकेला प्रशासनानी केलेली आहे. तसेच आदिवासी राखीव निधी आपण ठेवलेला आहे.

सुरेश खंडेलवाल :-

मा. महापौर मॅडम माझी विनंती आहे की आज आपण बजेटसाठी सभा ठेवलेली आहे. उद्या किंवा परवा इतर भरपूर विषय आहेत.

मा. महापौर :-

माझी पण तिच इच्छा आहे.

सुरेश खंडेलवाल :-

सदस्यांना जे बोलायचे आहे ते बोलायची संधी मिळेल. 2-3 महासभा लगेच घ्या.

मा. महापौर :-

मी लवकरात लवकर महासभा लावेन. आज बजेटची सभा असल्यामुळे ठराविक मुद्द्यावरच आपल्याला बोलायचे आहे.

सुरेश खंडेलवाल :-

महापौर मॅडम मी स्टॅन्डिंगमध्ये असल्यामुळे बऱ्याच विषयावर मी माझे म्हणणे मांडले आहे. माझा एक विषय आहे. आपण मिरा भाईंदर शहरामध्ये बऱ्याच रस्त्यासाठी आपण सॉल्ट विभागाला एफिडेव्हीट लिहून दिलेले आहे. बरेच रस्ते सॉल्ट विभागाच्या डिस्प्यूटमुळे रखडलेले आहे. त्यामुळे महापालिकेनी त्याला पैशाचे एफिडेव्हीट भरून दिलेले आहे. सॉल्ट डिपार्टमेंट टी.डी.आर घेत नाही. मी उदाहरण सांगतो भाईंदर पश्चिम महेश्वरी भवन ते मिरारोड पश्चिम स्टेशन पर्यंतचा जो आहे. त्याच्यासाठी 45 कोटीची एफिडेव्हीट आपण त्यांना दिलेली आहे. तो प्रस्ताव राज्य शासनाकडून केंद्र सरकारकडे गेला आणि तिकडून मंजूरी आली तर आपण त्यांना पैसे कूटून देणार. ह्या बजेटमध्ये आपण रस्त्यासाठी किती रक्केमध्ये सॉल्ट विभागाकडून अडथळा निर्माण होतो त्याच्यासाठी आपण एकही रुपया ह्याच्यात ठेवला नाही. कदाचित आपल्याला त्यांची मंजूरी मिळाली तर आपण त्यांना पैसे कूठून देणार?

मा. महापौर :-

तुम्ही स्टॅन्डिंमध्ये होते ना.

सुरेश खंडेलवाल :-

सभापती महोदय 100-150 कोटी ठेवा आपल्याला द्यायला लागणार आहेत. महापौर मॅडम चांगला विषय घेतो शहरासाठी घेतो. आम्ही स्टॅन्डिंगमध्ये रि-ॲप्रोप्रिएशन करतो किंवा आपण बजेट करतो. रि-ॲप्रोप्रिएशनसाठी अकाऊंड डिपार्टमेंट देतो. त्यानंतर त्या डिपार्टमेंटला पैसे दिले आणि अशी उत्तर मिळत असतील की ज्या खात्यामध्ये वर्ग केले त्याच्यामध्ये पैसेच नाहीत. जर स्टॅन्डिंगनी रि-ॲप्रोप्रिएशन केले खात्यात पैसेच नाहीत तर असे अकाऊंट डिपार्टमेंट स्टॅन्डिंगमध्ये विषय कशाला देतात. स्टॅन्डिंग कमिटीमधून आस्थापना विभागाकडून 1 कोटी रुपये संगणक विभागाकडे वर्ग केले कारण इंटरनेटचे आणि इतर आपल्याकडे पैसे नव्हते. तिकडून बिल गेले तेव्हा अकाऊंट डिपार्टमेंट सांगते आमच्याकडे पैसे नाहीत. आपण जी काही चर्चा करतो त्याची अंमलबजावणी होणार आहे की नाही. मी आयुक्तांना विनंती करतो की हे जे करतो त्याची अंमलबजावणी व्हावी अकाऊंट डिपार्टमेंट.

मा. उपमहापौर :-

नक्की होणार.

अजित पाटील :-

पान क्र. 19 महापालिकेचे खर्च मोठ्या प्रमाणात वाढतो परंतू उत्पन्न वाढण्याचे प्रमाण कमी आहे. मालमत्ता कराच्या संदर्भात उत्पन्न कमी आहे आणि खर्च वाढते. 2019-20 साली महापालिकेचा मालमत्ता कर 60 कोटी झाला होता ज्यावेळी कोरोना जोरामध्ये होता त्यावेळी 20 टक्के वाढ झाली होती ती 72 कोटीनी झाली होती परंतु 2021-22 जी 72 टक्के वाढ झाली होती त्यामध्ये 7 ते 8 टक्के वाढ होणे अपेक्षित आहे. महापालिकेचे आजचे उत्पन्न 67 कोटी झालेले आहे.

मा. उपमहापौर :-

मा. महापौर मॅडम, सदस्य बोलतात त्या सुचना ऑलरेडी स्टॅन्डिंगमध्ये झाले आहे.

प्रशांत दळवी :-

ऑलरेडी चर्चा झालेली आहे महापौर मॅडम मी तुम्हाला सांगितलेले आहे.

मा. महापौर :-

ठिक आहे सन्मा. सदस्य तुमच्याकडे ठराव आहे.

प्रविण पाटील :-

महापौर मॅडम, आपल्या शहरामध्ये आपण क्रिडा महोत्सव भरवतो. त्याच्यामध्ये मी मागेही सुचना केली होती की एक कला महोत्सव भरावा. जेणेकरुन ह्या शहरामध्ये आपण अनेक प्रकारचे कलादालन बनवतो, बाळासाहेब ठाकरे कलादालन, प्रमोद महाजन कलादालन असू देत त्याच्याही पुढे जाऊन आपण 85 कोटी खर्च करुन एक नाट्यगृह बनवतो. त्याची पाहणी करत असताना मा. आमदार प्रताप सरनाईक व काही कलाकार आले होते. एक मिनी वेटर ही त्याच्यात आपण बनविलेले आहे. असे अनेक प्रकारची व्यासपीठ आपण ह्या शहरामध्ये बनविलेली आहेत. परंतु ह्या बजेटमध्ये अशी कुठलीही तरतूद नाही. 2015-16 च्या बजेटमध्ये आम्ही स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन मिळण्यासाठी एक थोडी फार तरतूद केली होती आणि आता बघितलं तर ती ही तरतूद वाढलेली आहे.

मा. महापौर :-

नक्की आपण हा विषय मागे चर्चा केला होता.

प्रविण पाटील :-

मागे तरतूद केली होती तुम्हाला विनंती आहे की ते हेड जेणेकरुन दाखवावीत जेणेकरुन मराठी वाड्मय असू द्या, हिंदी वाड्मय असू देत.

मा. महापौर :-

ठिक आहे सभापती महोदय, त्याचा एक हेड आणि ठराविक रक्कम त्यामध्ये नमुद करा.

प्रविण पाटील :-

स्थानिक प्रकारचे जे लोकल कलाकार आहेत म्हणजे ते कलाकार असतील किंवा मुर्तीकार असतील यांना एक व्यासपीठ द्यावे त्याच्यासाठी एक वेगळा हेड याच्यात तयार करावा.

मा. महापौर :-

मिरा भाईंदर क्षेत्रातील कलाकारांना वाव देण्यासाठी आपण घ्या बजेट मध्ये तरतूद करु.

निला सोंस :-

महापौर महोदया मैं गंभीर विषय पे बात कर रही हूँ, सिर्फ पॉईंट है में बजेट के अलावा मेने बात की नही है|

मा. महापौर :-

ठिक है बोलीए|

निला सोंस :-

पेज नं. 37 पॉईंट नं. 10 इस कार्यकाल में जितने भी महासभा हुई है या जितनी भी बार बजेट आया है हर बजेट में यह पॉईंट रहता है ॲन्ड दॅट इज LED आयुक्त महोदय ने भी इसमें प्रोव्हीजन दिखाया और स्थायी समितीने भी प्रोव्हीजन दिखाया है और यह LED का विषय हर बजेट में पास हुआ है लेकिन आज तक काम नही हुआ है| तो मेरी रिक्वेस्ट है की इस बार प्लीज LED के काम को कर दिया जाए क्योंकी बजेट में हम दिखा रहे है प्रोजेक्शन हो रहा है पर इम्पलीमेंटेशन नही हो रहा है तो में आयुक्त महोदय से निवेदन करुंगी क्योंकी आपके कार्यकाल में वॉर्ड में बहुत अच्छे काम हुए है तो आय विल रिक्वेस्ट यु की सर यह LED का हर बजेट में आता है इस बार कर दिजीएगा|

मा. महापौर :-

ठिक है जुबेरजी तुम्ही आता ठराव मांडा.

जुबेर इनामदार :-

मा. महापौर चर्चा केल्याशिवाय ठराव मांडणार नाही.

मा. महापौर :-

ठिक आहे बोला. जैन मॅडम तुम्ही बोला.

गिता जैन :-

महापौर मॅडम, मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद. पण माझे एक रिकमेन्डेशन राहणार की अजित पाटील साहेबांना बोलू द्या.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम, ही चुकीची पध्दत होत आहे. महापौर मॅडमचा अपमान होत आहे. महापौर मॅडम ज्यांना सन्मान देत आहे ज्यांना बोलायची संधी देत आहेत त्यांनी बोलावे.

गिता जैन :-

उपमहापौर साहेब कदाचित आपण पण महापौरांचा अपमानच केला आहे. तुम्ही पण बोलायच्या आधी परमिशन घेतली नाही.

मा. उपमहापौर :-

याबद्द सर्वांसमोर मी माफी मागतो.

मा. महापौर :-

सर्वांनी माझी परवानगी घेऊन बोलायचे आहे आणि सगळ्यांना बोलायची संधी दिलेली आहे.

अजित पाटील :-

मॅडम मी बजेटवरती बोलणार आहे. मी बजेटच्या व्यतिरिक्त काही बोलणार नाही.

मा. महापौर :-

मला असे वाटते तुम्ही बजेटवर भरपूर बोलले होते. सन्मा. सदस्य गिता जैन मॅडम तुम्ही बोला.

गिता जैन :-

महापौर मॅडम, सगळ्यात पहिला माझे मत हेच आहे की फुगलेले बजेट आहे. दोन तीन एक्झाम्पल देते तुम्ही 110 कोटी जे 500 स्क्वेअर फिटच घरासाठी अनुदान दाखवलेले आहे. आपल्यालाही माहित आहे ते अनुदान येणार नाही. फक्त आपण ते प्रसिध्दीसाठी लिहिले असेल तर मला त्याचे काही म्हणणे नाही. पण मॅडम आपली खरीच इच्छा असेल का 500 स्क्वेअर फिटला आपण अनुदान द्यायचे आहे. म्हणजे त्यांना फ्री करायचे आहे तर बरीच अशी निधी आहे आपण स्वेच्छा निधी महापौर, उपमहापौर, विरोधी पक्षाची सगळ्यांची स्वेच्छा निधी जे टोटली इललिगल आहे परत माझा आक्षेप आहे स्वेच्छा निधी टोटली इललिगल आहे कुठला हेड कुठला कलम आहे हे मला सांगाव सभापती महोदयांनी कारण आपण आयुक्तांना बोलू देत नाही नाहीतर त्यांना विचारले असते मॅडम मी एक जी.आर आणलेला आहे मी आपल्याला कॉपी देणार. त्याचा मेन हेड वाचायचा आहे की हे का इललिगल आहे ते सांगायला मी हा जी.आर. आणलेला आहे. नगरसेवक स्वेच्छा निधीची मर्यादा महापालिकेच्या उत्पन्नाशी निगडीत ठेवल्यास नगरसेवक स्वेच्छा निधीमध्ये एक सुसुत्रता नियंत्रण राहू शकेल. मर्यादा महापालिकेचा उत्पन्नाच्या आधारे उत्पन्न बजेट नाही. उत्पन्नाच्या आधारे निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती आणि त्यानंतर परिपत्रक काय निघालेले आहे ते सांगते. राज्यातील महापालिकातर्फे वार्षिक अंदाजपत्रकात राखून ठेवण्यात येणारा नगरसेवक स्वेच्छा निधी महापालिकेच्या वार्षिक उत्पन्नाचा जास्तीत जास्त 2 टक्के नगरसेवक स्वेच्छा निधी म्हणून त्याचा वार्षिक अंदाजपत्रकामधून राखून ठेऊन येणार आणि त्यासाठी खालील अटीशर्तीच्या अधीन शासन मान्यता देत आहे. 2 टक्के प्रमाणे निश्चित केलेला नगरसेवक स्वेच्छा निधी हा कमाल मर्यादेत राहिल. अस्तित्वातील प्रथेनुसार महापालिकेचा सध्या जो निधी उपलब्ध करुन देतात व पुढेही तेवढाच निधी उपलब्ध करुन देणार असतील तर असा निधी वरील सुत्रानुसार येणाऱ्या निधीपेक्षा कमी असल्यास तो वाढविण्याचे बंधन महापालिकेवर राहणार नाही. असा निधी उपलब्ध करुन देण्यास महापालिका तयार नसल्यास तसे करण्याचेही महापालिकेवर बंधन राहणार नाही. उक्त 2 टक्के प्रमाणे निधी अंदाजपत्रकात राखून ठेवून उपलब्ध करुन देण्याचा निर्णय महापालिकेने सन 2002-03 ह्या

वार्षिक वर्षापासून लागू करावा व तशी तरतूद अंदाजपत्रकात करावी. तर मॅडम हे जे खूप मोठी लांब लाईन बघितली स्वेच्छा निधी हे ते कुठे येते इथे आणि कशी येते ते टोटल इललिगल आहे म्हणून मला असे वाटते की आयुक्त साहेबांनी हे त्यांच्या कार्यालयात पाठवावेच लागेल मी आपल्याला हे पाठवून देणार.

सुरेश खंडेलवाल :-

2 टक्केच्या हिशोबाने किती अमाऊंट होते तो विषय आम्हाला समजलाच नाही.

गिता जैन :-

हरकत नाही तुम्हाला जी.आर पाठवेल.

मा. महापौर :-

ठिक आहे तुम्ही जे बोललात ते नमुद केले जाईल.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम, ह्या विषयावर याचा खुलासा मी करु इच्छितो मलाही बोलण्याची संधी द्यावी.

गिता जैन :-

आता प्रयोजन अनिल भोसले साहेबांनी सांगितले बऱ्याच नगरसेवकांची कळकळ होती की आपले प्रयोजन प्रत्येक ठिकाणी पोहचेल तसे नसते. मी उदाहरण देते सुर्याचे जो प्रकल्प आहे तो 5 वर्षाआधी मंजूर झालेले आहे. तेव्हा पासून आपल्याला माहित होते की पाणी आपल्याला फक्त आणि फक्त चेण्यापर्यंत भेटणार आहे. इंटरनल पाईप लाईन जी.एस.आर पंप हाऊस हे सगळीच व्यवस्था आपल्याला आपली निधी मधून करायची आहे. आपण ह्या 5 वर्षात आणि इव्हन ह्या बजेटमध्ये त्यासाठी कुठेही आपण बजेटची प्रोव्हीजन केलेली नाही आणि मला वाटते जेव्हा बजेटची चर्चा होत होती तेव्हा हा निधी मी शासनाकडून आणणार त्याची कल्पना कुणालाही नसावी आणि नसेलच कारण मलाही नव्हती. तर बजेटमध्ये चर्चा करणारा नगरसेवकाला तर असूच शकत नाही. पण तरीही 5 वर्षात आपण एकही प्रोव्हीजन असे केले नाही की जेणेकरुन जेव्हा सुर्याचे पाणी आपल्याला चेण्यापर्यंत येणार तेव्हा तिथुन इथपर्यंत म्हणजे इंटरनल पाईप लाईनसाठी 5 वर्ष आपण काहीच केले नाही. हे प्रयोजन असते वारंवार माझा एक प्रश्न आहे की हा मलप्रवाह जो कर आपण लावतो मुळात त्याची आपण उपविधी न करता लावलेले आहे. म्हणून ते टोटली इललिगल आहे. तरीही ज्यांना अजूनपर्यंत आपण सुविधा ही दिलेली नाही त्याला आपण वर्षानुवर्ष किती अन्याय करतो म्हणजे आता कोरोना काळात किती लोकांनी मलप्रवाह कर भरला, दरवेळी त्याच्यासाठी आपल्याकडून एक सांगितले जाते की सिव्हरेज आपण जे जे मल असते म्हणजे त्याची टाकी असते सेप्टीक टँक ते आपणच साफ करतो. म्हणून ते कर आहे. म्हणजे आपण बरोबर घेत आहोत. पण मला एक सांगा कुठले आपण सेप्टीक टँक बिना आपण पैसे घेऊन बिना फीज घेऊन साफ करायला जातो. मग आपले नागरीक डबल कर भरत आहेत. म्हणजे जेव्हा जेव्हा सेप्टीक टँक साफ करतो तेव्हाही आपण पैसे घेतो आणि त्यांना अजूनपर्यंत न मिळालेली सुविधा बद्दल आपण अजून कर घेतो. आपण खुप मोठी मोठी गोष्ट करु नका. 500 फ्री द्यायचे हे फ्री द्यायचे. तुम्ही एवढच फ्री देऊन टाका. तेवढा कर माफ करुन टाका. कारण आपण सुविधाही देत नाही आणि कर ही घेतो. ते ही इललिगल आहे आपण उपविधी केलेली नाही. आता 110 कोटी अनुदानाचा विषय जरी निघाला तरी मला 2 मिनीटे ह्यासाठी बोलायचे आहे की आपण ते अनुदान मिळणार असे गृहित धरले आहे आणि तिथे अनुदानामध्ये ठेवला आहे. खर्च बाजू ते दाखवले आहे बॅलेंसशिट कुठे खराब होत नाही पण बजेट यामुळे फुगते हा एक बाकी तर फुगलेलं सगळ्यांनी सांगितले आहे. आपला टॅक्स कधीच तेवढा जमा होत नाही. आयुक्त साहेबांनी प्रोजेक्ट केलेला टॅक्स ही तेवढा जमा होणार की नाही याबद्दल मला शंका आहे 95 आणि आपण त्यावरुन 150 अजून पर्यंतचा रेकॉर्ड बघा मॅडम आपण किती परसेंटने वाढलो आहे आणि त्यात आपले अजून जे अकाऊंट आहे ते आपण काढलेले नाही. माझे दरवेळी वारंवार हे असते की डेड अकाऊंट काढा

